७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शनिवार, दि. १३ जून २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# ‘मोदी केवळ सर्वाधिक काळ पंतप्रधान नाहीत, तर सर्वोत्कृष्टही’

## फडणवीसांनी केले कौतुक, काँग्रेसला ‘बुडते जहाज’ म्हणत विरोधकांवरही हल्लाबोल

**मुंबई (दै. संध्या)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला 12 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारच्या कामगिरीचा गौरव केला. देशाची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार, महिला सक्षमीकरण, गरिबी निर्मूलन आणि जागतिक स्तरावरील भारताची वाढती प्रतिष्ठा यांचा उल्लेख करत फडणवीस यांनी मोदी यांना “केवळ सर्वाधिक काळ निवडून आलेले पंतप्रधान नव्हे, तर देशाचे सर्वोत्कृष्ट पंतप्रधान” असे संबोधले. याचवेळी त्यांनी काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवरही टीका करत काँग्रेसला “बुडते जहाज” म्हटले.




फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 4,399 दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ निवडून आलेल्या पंतप्रधानांचा विक्रम मोडला आहे. महाराष्ट्रातील 14 कोटी जनतेच्या वतीने त्यांनी मोदी यांचे अभिनंदन केले.

त्यांच्या मते, एखाद्या नेत्याचा कार्यकाळ किती मोठा आहे यापेक्षा त्या काळात देशासाठी काय काम झाले हे अधिक महत्त्वाचे असते. मोदी यांनी जगभरात भारताची प्रतिष्ठा उंचावली असून आज एनडीए देशातील 22 राज्यांमध्ये सत्तेत आहे. देशाच्या सुमारे 80 टक्के भूभागावर एनडीएची सरकारे आहेत, असे त्यांनी सांगितले.

देशाच्या आर्थिक प्रगतीचे आकडे मांडताना फडणवीस म्हणाले की, भारत आज जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. जागतिक मंदीचे वातावरण असतानाही भारताचा विकासदर 7 टक्क्यांहून अधिक आहे आणि जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. भारताची अर्थव्यवस्था 345 लाख कोटी रुपयांच्या पुढे गेली असून देश 5 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे. भारताकडे सध्या 67 लाख कोटी रुपयांहून अधिक परकीय चलन साठा असून पुढील 11 महिन्यांच्या आयातीचा खर्च भागवण्याची क्षमता देशाकडे आहे

भारताच्या आर्थिक स्थितीबाबत बोलताना फडणवीस यांनी महत्त्वाचा दावा केला. ते म्हणाले, "एकेकाळी भारत परदेशी कर्जाच्या ओझ्याखाली दबला होता. कर्जफेडीसाठीही पुरेसे पैसे उपलब्ध नसत. मात्र आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. भारताकडे इतका परकीय चलन साठा आहे की देशावरील परदेशी कर्जापैकी तब्बल 94 टक्के कर्ज एका दिवसात फेडण्याची क्षमता आपल्याकडे आहे."

### ‘यूपीएच्या काळात जे शक्य नव्हते ते आज वास्तव’

यूपीए सरकारच्या काळात देशाकडे एका महिन्याच्या आयातीची क्षमता नव्हती, असा दावा करत फडणवीस म्हणाले की, आज भारताकडे 11 महिन्यांच्या आयातीची क्षमता आहे. जीएसटी संकलन 22 लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले असून त्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. डिजिटल व्यवहारांच्या क्षेत्रात भारताने चीनलाही मागे टाकले असल्याचे सांगत त्यांनी नमूद केले की, यूपीआयद्वारे 314 लाख कोटी रुपयांचे व्यवहार होत आहेत आणि भारताने विकसित केलेली यूपीआय प्रणाली आता 30 देश वापरत आहेत. लवकरच ब्राझीलही यूपीआय प्रणाली स्वीकारणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# स्पर्धा परीक्षा, संशोधन अन् प्रशिक्षणासाठी सारथीला ३५ कोटींची आर्थिक ताकद

**पुणे (दै. संध्या)**

राज्यातील मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची घोषणा करण्यात आली असून, महाराष्ट्र शासनाने ‘सारथी’ संस्थेला तब्बल 35 कोटी 34 लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) नियोजन विभागाने जारी केला असून, या निधीमुळे स्पर्धा परीक्षा, संशोधन, कौशल्य विकास आणि शैक्षणिक उपक्रमांना मोठी चालना मिळणार आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, रोजगार आणि प्रशासकीय सेवांमध्ये संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) या संस्थेला आर्थिक वर्ष 2025-26 साठी हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पुणे येथील सारथी संस्था ही महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत कार्यरत आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचे काम ही संस्था करते. या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी




मोफत मार्गदर्शन आणि प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये UPSC, MPSC, बँकिंग, रेल्वे, पोलीस भरती तसेच इतर शासकीय सेवांच्या परीक्षा यांचा समावेश आहे. याशिवाय संशोधन, शिष्यवृत्ती आणि कौशल्य विकासाशी संबंधित अनेक योजना देखील राबवल्या जातात. शासन निर्णयानुसार, मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी राखीव असलेल्या तरतुदीतून हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. एकूण 35 कोटी 34 लाख 23 हजार रुपये सारथी संस्थेला वितरित करण्यात येणार असून, त्यातून विद्यार्थ्यांसाठीच्या विविध योजना आणि उपक्रम राबवले जाणार आहेत.

# शरद पवारांना होती काँग्रेस अध्यक्षपदाची ऑफर!

## राष्ट्रवादीच्या काँग्रेसमध्ये विलीनीकरणाच्या चर्चेदरम्यान मोठा खुलासा, राजकीय चर्चांना उधाण

**मुंबई (दै. संध्या)**

देशाच्या राजकारणात भाजपविरोधी पक्षांची एकजूट, इंडिया आघाडीचे भविष्य आणि प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व यावर चर्चा सुरू असतानाच शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या काँग्रेसमध्ये संभाव्य विलिनीकरणाच्या चर्चांनी पुन्हा एकदा जोर धरला आहे. त्यातच आता एक मोठा राजकीय खुलासा समोर आल्याने या चर्चांना अधिकच बळ मिळाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 2024 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस नेतृत्वाने स्वतः शरद पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे



काँग्रेसमध्ये विलिनीकरण करण्याचा प्रस्ताव दिला होता. एवढेच नव्हे, तर त्या बदल्यात त्यांना थेट काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्याची ऑफरही देण्यात आली होती, असा दावा समोर आला आहे. राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, गांधी परिवारातील एका वरिष्ठ नेत्याने शरद पवार यांच्याशी या विषयावर चर्चा केली होती. देशातील सर्वाधिक अनुभवी राजकारण्यांपैकी एक असलेल्या पवारांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला नवसंजीवनी मिळू शकते, असा विचार काँग्रेस नेतृत्वात होता. जर त्या वेळी हा प्रस्ताव स्वीकारला गेला असता, तर आज काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मल्लिकार्जुन खरगे यांच्या जागी शरद पवार असते, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. शरद पवार यांनी 1999 मध्ये काँग्रेसपासून वेगळे होत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती. पक्षाचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व टिकवून ठेवणे आणि प्रादेशिक राजकारणात स्वतंत्र भूमिका कायम ठेवणे हे त्यांचे धोरण राहिले आहे. त्यामुळे काँग्रेसकडून आलेली अध्यक्षपदासारखी मोठी ऑफर असूनही पवारांनी ती नम्रपणे नाकारल्याचे सांगितले जात आहे. त्यावेळी महाविकास आघाडी मजबूत होती आणि लोकसभा निवडणुकीत विरोधकांना सकारात्मक वातावरण असल्याने स्वतंत्र पक्ष म्हणून लढणे फायदेशीर ठरेल, असा विचारही त्यामागे असल्याचे मानले जाते. मात्र 2023 मध्ये अजित पवार यांनी राष्ट्रवादीत बंड करत पक्षाचा मोठा गट सोबत घेतला. त्यानंतर शरद पवारांच्या पक्षासमोर संघटनात्मक आणि राजकीय आव्हाने निर्माण झाली. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळाले असले, तरी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शरद पवार गटाला अनेक ठिकाणी संघर्ष करावा लागला.


### नाना पटोलेंच्या वक्तव्याने वाढल्या चर्चा

दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी नुकतेच केलेल्या वक्तव्याने या चर्चांना आणखी हवा मिळाली. भाजपविरोधी लढाई मजबूत करण्यासाठी धर्मनिरपेक्ष विचारांचे पक्ष काँग्रेससोबत येण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी म्हटले होते.

### राष्ट्रवादीकडून सावध भूमिका

दुसरीकडे, शरद पवार गटातील नेत्यांनी मात्र विलिनीकरणाच्या चर्चांपासून काहीसे अंतर ठेवले आहे. राष्ट्रवादीच्या नेत्या विद्या चव्हाण यांनी अशा कोणत्याही प्रस्तावाची अधिकृत माहिती नसल्याचे स्पष्ट केले आहे. तथापि, भाजपविरोधी मतांचे विभाजन टाळण्यासाठी विरोधकांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे विलिनीकरण नसले तरी भविष्यात अधिक मजबूत राजकीय आघाडीची शक्यता नाकारता येत नाही.

### ढिंग-टांग




## पेट्रोल-डिझेल पुरवठा नियंत्रणासाठी नवीन आदेश जारी

# डिझेल खरेदीवर केंद्र सरकारची मर्यादा




**मुंबई (दै. संध्या)**

जागतिक भू-राजकीय परिस्थिती, आंतरराष्ट्रीय पेट्रोलियम पुरवठा साखळीतील अडचणी आणि देशातील काही भागांत पेट्रोल-डिझेलच्या असामान्य खरेदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने “मोटर स्पिरिट आणि हाय स्पीड डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे तात्पुरते नियमन) आदेश जारी केला आहे. पेट्रोल पंपावर एका वाहनाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल मिळणार आहे. हा आदेश ११ जून २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला असून तो तत्काळ लागू झाला आहे.

आदेश म्हटले आहे, पेट्रोल (मोटर स्पिरिट) आणि डिझेल (हाय स्पीड डिझेल) या अत्यावश्यक वस्तू असून मालवाहतूक, प्रवासी वाहतूक, शेतीची कामे, आपत्कालीन सेवा, राष्ट्रीय सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी त्यांचा अखंड पुरवठा आवश्यक आहे.

केंद्र सरकारच्या निरीक्षणानुसार, किरकोळ विक्री केंद्रांवरील (पेट्रोल पंपांवरील) आणि घाऊक विक्रीतील किंमतींमध्ये असलेल्या फरकामुळे अनेक औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहक मोठ्या प्रमाणात पेट्रोल पंपांवरून डिझेल खरेदी करत आहेत. यामुळे सामान्य ग्राहकांसाठी राखीव असलेला पुरवठा वळविला जात असून काही भागांत स्थानिक तुटवड्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच साठेबाजी, अनधिकृत विक्री आणि इतर गैरप्रकारांना चालना मिळण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

संस्थात्मक, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना किरकोळ विक्री केंद्रांवरून (पेट्रोल पंपांवरून) पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करता येणार नाही. अशा ग्राहकांनी त्यांच्या गरजांसाठी स्वतःच्या ग्राहक पंपांमधूनच इंधनाचा पुरवठा करावा लागेल.

पेट्रोल पंप चालकांना डिझेलची विक्री केवळ वाहनाच्या टाकीत किंवा PESO मान्यताप्राप्त कंटेनरमध्येच करता येईल. या शिवाय एका ग्राहकाला किंवा वाहनाला दिवसाला २०० लिटरपेक्षा अधिक डिझेल विकता येणार नाही. अशा प्रकारे खरेदी केलेल्या डिझेलची पुनर्विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्या (OMCs) आणि पेट्रोल पंप चालकांनी या आदेशाचे काटेकोर पालन सुनिश्चित करणे तसेच नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक राहणार आहे.

या तरतुदींनुसार जारी होणारे कोणतेही निर्बंधात्मक आदेश सुरुवातीला जास्तीत जास्त ९० दिवसांसाठी लागू राहतील. आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेशाद्वारे त्याची मुदत वाढविता येईल.

राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांना साठेबाजी, काळाबाजार, अनधिकृत खरेदी, पुरवठा वळविणे आणि इतर गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यक वस्तू कायदा १९५५ तसेच इतर लागू कायद्यांअंतर्गत अशा प्रकरणांवर कारवाई केली जाईल.

### उल्लंघन केल्यास कारवाई

या आदेशातील तरतुदींचे किंवा त्याअंतर्गत जारी करण्यात आलेल्या निर्देशांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर आवश्यक वस्तू कायदा, १९५५ आणि इतर लागू कायद्यांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

# विधान परिषद निवडणुकीत ६ जागा बिनविरोध

## *उर्वरित ११ मतदारसंघांत रंगणार प्रतिष्ठेची लढत*

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीत यंदा मोठी राजकीय चुरस पाहायला मिळत आहे. राज्यातील १७ पैकी ६ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले असून उर्वरित ११ मतदारसंघांसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील थेट संघर्षाबरोबरच काही ठिकाणी बंडखोर आणि अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीची रंगत आणखी वाढवली आहे.

या निवडणुकीत सर्वसामान्य मतदार मतदान करत नसून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, नगरपंचायत आणि महानगरपालिकांमधील निवडून आलेले लोकप्रतिनिधी मतदानाचा हक्क बजावतात. त्यामुळे ही निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पक्षांच्या वास्तविक ताकदीची कसोटी मानली जाते.

विधान परिषदेच्या या निवडणुका प्रमाण प्रतिनिधित्व पद्धती आणि एकल संक्रमणीय मत (एसटीव्ही) पद्धतीने घेतल्या जातात. मतदार उमेदवारांना पहिली, दुसरी, तिसरी अशा पसंतीक्रमानुसार मतदान करतात. मतमोजणीची सुरुवात पहिल्या पसंतीच्या मतांपासून होते. आवश्यक कोटा मिळाल्यास उमेदवार थेट विजयी ठरतो. अन्यथा सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराची मते पुढील पसंतीनुसार इतर उमेदवारांकडे वर्ग केली जातात.




विजयासाठी आवश्यक कोटा हा एकूण वैध मतांची संख्या आणि रिक्त जागांच्या संख्येच्या आधारे निश्चित केला जातो. उदाहरणार्थ, ५०० वैध मते आणि एक जागा असल्यास २५१ मतांचा कोटा आवश्यक ठरतो. त्यामुळे पहिल्या पसंतीबरोबरच दुसरी आणि तिसरी पसंतीची मतेही अनेकदा निकालावर निर्णायक परिणाम करतात.

यंदा महायुतीने निवडणुकीपूर्वीच सहा जागा बिनविरोध जिंकत आघाडी घेतली आहे. ठाणे येथून रवींद्र फाटक, यवतमाळमधून दुष्यंत चतुर्वेदी, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून अनिकेत तटकरे, पुण्यातून विक्रम काकडे, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोलीमधून अरुण लखाणी आणि अहिल्यानगरमधून प्राजक्त तनपुरे हे बिनविरोध विजयी झाले आहेत.

उर्वरित ११ मतदारसंघांमध्ये मात्र चुरशीच्या लढती होणार आहेत. सोलापूरमध्ये भाजपचे राजेंद्र राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे वसंतराव देशमुख आमनेसामने आहेत. जळगावमध्ये भाजपचे नंदकिशोर महाजन, ठाकरे गटाचे शरद तायडे आणि बंडखोर रेश्मा काळे यांच्यात तिरंगी सामना आहे. सांगली-सातारा मतदारसंघात भाजपचे धैर्यशील कदम, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अभयसिंह जगताप आणि अपक्ष किशोर धुमाळ यांच्यात लढत होत आहे. नांदेडमध्ये भाजपचे अमर राजूरकर आणि काँग्रेसचे रामदास पाटील, तर नागपूर पोटनिवडणुकीत भाजपचे डॉ. राजीव पोतदार आणि काँग्रेसचे अतुल लोंढे यांच्यात सामना रंगणार आहे. भंडारा-गोंदिया, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या मतदारसंघांमध्येही महायुती आणि विरोधकांमध्ये थेट लढती होत आहेत.

नाशिक मतदारसंघ विशेष चर्चेत असून शिवसेनेचे नरेंद्र दराडे आणि अपक्ष गोकुळ गीते यांच्यातील सामना लक्षवेधी ठरत आहे. अमरावती, जळगाव, नाशिक, सांगली-सातारा आणि परभणी-हिंगोली या मतदारसंघांमध्ये बंडखोरी आणि संभाव्य क्रॉस व्होटिंगमुळे निकालाचे गणित बदलू शकते, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.




# संपादकीय

## पाकमध्ये गव्हाचं पीठ १४० रु. किलो! लोक संतप्त

पाकिस्तानच्या चिंता कुठल्याही प्रकारे थांबायला तयार नाहीत. तेथील सर्वसामान्य लोकांच्या स्वयंपाकघरावर दुहेरी संकट कोसळलं आहे. एका बाजूला इराण युद्धामुळे डिझेल, पेट्रोल आणि गॅसची वारेमाप टंचाई निर्माण झाली आहे, तर दुसऱ्या बाजूला गव्हाच्या उत्पादनानं ठेंगा दाखवला आहे. किरकोळ बाजारात गव्हाचं पीठ तब्बल १४० पाकिस्तानी रुपये प्रतिकिलो दरानं विकलं जात आहे! सरकारनं या पिठाची अधिकृत किंमत १०७ रुपये प्रतिकिलो निश्चित केली होती. पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांनी यासंदर्भात आदेश दिले आहेत की, ज्या व्यापाऱ्यांकडे गव्हाचा साठा आहे त्यांनी तातडीनं त्याचा संपूर्ण तपशील द्यावा, अन्यथा त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. सरकारला भीती आहे की, गव्हाच्या कमतरतेमुळं येत्या काही दिवसांत पिठाच्या किमती आणखी झपाट्यानं वाढतील.

पाकिस्तानच्या सिंध प्रांतात गहू खरेदी योजना मोठ्या प्रमाणात अपयशी ठरली आहे. सरकारनं १० लाख मेट्रिक टनचं उद्दिष्ट ठेवलं होतं; मात्र, केवळ ७९,८३५ टन गहू खरेदी करता आला. म्हणजेच उद्दिष्टाच्या ८ टक्केही पूर्तता होऊ शकलेली नाही. यानंतर गहू आणि पिठाच्या किमतींत झपाट्यानं वाढ झाली. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचं कंबरडं मोडलं आहे. खुल्या बाजारात गव्हाच्या किमती सुमारे २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. कराचीमध्ये १०० किलो गव्हाची किंमत ११,१०० पाकिस्तानी रुपयांपर्यंत पोहोचली आहे, तर हैदराबादमध्ये १०० किलो गहू १०,९०० पाकिस्तानी रुपयांना विकला जात आहे. पाकिस्तानमध्ये निर्माण झालेल्या गव्हाच्या संकटाला काही जण भारतालाही जबाबदार धरत आहेत. भारताकडून गेल्या वर्षी सिंधू जल करार स्थगित करण्यात आला होता. त्यामुळे पाकिस्तानला मिळणाऱ्या पाण्यात घट झाली होती. त्यामुळे पाकिस्तानमधील गहू संकटामागे भारताचा 'हात' आहे, असं काही जणांचं म्हणणं आहे. मात्र, तसं अजिबात नाही. पाकिस्तानच्या स्वतःच्या अनेक समस्या यासाठी कारणीभूत आहेत. योग्य सिंचन व्यवस्थेचा अभाव, जुन्या कालवा व्यवस्था, भूजलाची कमतरता यांसारखी कारणंही या संकटामागे आहेत. सरकारनं २०२५-२६च्या हंगामासाठी १ एप्रिलपासून खरेदी मोहीम सुरू केली होती. शेतकऱ्यांना ४० किलो गव्हासाठी ३,५०० पाकिस्तानी रुपये हमीभाव देण्याची घोषणा करण्यात आली होती. याशिवाय



गोण्यांसाठीही स्वतंत्र मोबदल्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, ही योजना यशस्वी होऊ शकली नाही. सर्वच बाजूंनी पिचलेली पाकिस्तानी जनता आता सरकारवर प्रचंड वैतागली आहे. कोणत्याही बाजूनं आशेचा किरण नसल्यानं आणि सामान्य लोकांचे दोन वेळच्या जेवणाचेही हाल होत असल्यानं सरकारनं आम्हाला आता मरण्यासाठीच सोडून दिलं आहे का, असा सवाल जनता विचारू लागली आहे. लोक रस्त्यावर येऊ लागले आहेत. अशा परिस्थितीत पाकिस्तानी जनतेच्या संतापाचा कडेलोट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## संस्कृत सुभाषित

शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो हि न सर्वत्र चंदनं न वने वने ॥

अर्थ – प्रत्येक पर्वतावर माणिक सापडत नाहीत, प्रत्येक हत्तीच्या ठायी (गंडस्थळात) मोती सापडत नाहीत, सर्वच ठिकाणी सभ्य लोक (साधु–संत) आढळत नाहीत आणि प्रत्येक वनात चंदन सापडत नाही.

## गुरु वचन

### ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग

विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग आहेत–ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मानवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.

काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मानवास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ–मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करु इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम–भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मानवसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## उपदेशकथा

### ईश्वर तो पाहील

शेख सादी आपल्या वडिलांच्या बरोबर मक्केला जात होते. मंडळींचा नियम असा होता की, पहाटे अगदी लवकर उठून ईश्वराची प्रार्थना करायची. एके दिवशी सादी लवकर उठले आणि त्याने ईश्वराची प्रार्थना केली. प्रार्थना झाल्यावर इतर काही लोक स्वस्थ निजलेले त्याने पाहिले. त्यांना पाहून सादी वडिलांना म्हणाले, ''बाबा, हे पाहा आळशी लोक ! प्रार्थनेला न उठता स्वस्थ निजले आहेत.'' सादीचे पिता सूफी होते. तो म्हणाले, ''बेटा सादी ! तू उठला नसतास तर बरे झाले असते. तुझी प्रार्थाना वाया गेली. ईश्वराचे लक्ष त्यांच्याकडे आहे. त्यांचा दोष काढण्याचा अधिकार आपल्याला नाही. प्रार्थना झाल्यावर दुसऱ्याची निंदा करणे ईश्वराला कसे आवडेल?''

कथा उपदेश : परनिंदा करणे कधीही वाईटच.

## पंचांग

| पंचांग | नक्षत्र:कृत्तिका |
|---|---|
| १३ जून २०२६ | २५:१६:४१+ |
| शनिवार | योग:सुकर्मा १७:२७:५८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:वणिज १६:०७:५९ |
| अधिक ज्येष्ठशके | करण:विष्टि २६:१५:४१+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:वृषभ०९:२५:०८ |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास–अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – २७ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:त्रयोदशी १६:०७:५९ | शिवरात्री |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९७८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | 1 | | 3 | 6 | |
| | | | | | | 7 | | 1 |
| 1 | 6 | 8 | 3 | | 9 | 2 | 4 | |
| | | 5 | 4 | | 3 | | | 2 |
| | | | | 5 | | | | |
| 3 | | | 1 | | 7 | 4 | | |
| | 3 | 7 | 5 | | 1 | 8 | 2 | 4 |
| 2 | | 9 | | | | | | |
| | 8 | 1 | | 4 | | | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९७७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 6 | 2 | 1 | 4 | 8 | 3 | 5 | 7 |
| 4 | 1 | 5 | 6 | 3 | 7 | 8 | 9 | 2 |
| 8 | 7 | 3 | 5 | 9 | 2 | 1 | 4 | 6 |
| 1 | 9 | 7 | 4 | 8 | 6 | 5 | 2 | 3 |
| 3 | 8 | 6 | 2 | 1 | 5 | 9 | 7 | 4 |
| 2 | 5 | 4 | 3 | 7 | 9 | 6 | 1 | 8 |
| 7 | 4 | 1 | 9 | 6 | 3 | 2 | 8 | 5 |
| 6 | 2 | 8 | 7 | 5 | 1 | 4 | 3 | 9 |
| 5 | 3 | 9 | 8 | 2 | 4 | 7 | 6 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८४ – आधी आगगाडीत बसायला तयार नसलेल्या राणी व्हिक्टोरियाने आगगाडी लोकप्रिय व्हावी म्हणून आगागाडीतून पहिल्यांदाज प्रवास केला.
- १८९३ – महिलांची पहिली जागतिक गोल्फ स्पर्धा मागरिट स्कॉट यांनी जिंकली.

### राष्ट्रीय

- १८१७ – दुसऱ्या बाजीरावने खडकीची लढाई पर्वतीवरून दुर्बिणीने बघितली. याच दिवशी नंतर पेशवे आणि इंग्रज यांच्यामध्ये तह झाला.
- १८४०– सरदार उधमसिंग यांनी ब्रिटिशांनी फासी दिली.
- १९५१– प्रेम माथूत या महिलेला प्रवासी विमान चालविण्याचा परवाना मिळाला. त्या पहिल्या भारतीय महिला वेमानिक ठरल्या.

### जन्म

- १७७३ – प्रकाशाचा अभ्यास करून प्रकाशलहीरचें अस्तित्व सिद्ध करणारे थॉमस यंग यांचा जन्म. त्यांनी डोळ्याच्या अंतर्भागाचा अभ्यक्षास केला. केशकर्पणाची माहिती प्रसिद्ध केली इज्पितमधील प्राचीन चित्रलिपीचा अर्थही त्यांनीच लावला.
- १८६५ – सन १९३२ चा साहित्याच्या नोबेल पुरस्कार मिळविणारा विल्यम बटलर यांट्स या आयरिश कवीचा जन्म.
- १९४५– साहित्यिक, नाटककार दत्ता भगत यांचा जन्म.

### निधन

- १९३८ – १९२० चा पदर्थविज्ञानाचा नोबेल पुरस्कार चार्ल्स ऐदुआर्द गियोम यांचे निधन.
- १९६७– छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुण्यातील अश्वारूत्रढ पुतळा तयार करणारे शिल्पकार विनायक पांडूरंग करमरकर यांचे निधन.

## : SMS :

Ants were enjoying a party in the Tent at Jungle. SUDDENLY. A Elephant Jumped in the Tent, All ants ran-away but an ANT climbed on the back of ELEPHANT. What the other ants SHOUTED! DABA DABA K MAARNA SALEEY KO.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४० | २५.५ |
| अहमदनगर | ४०.२ | २४.७ |
| अकोला | ४५.६ | ३१.७ |
| अमरावती | ४३.१ | ३१.७ |
| बीड | ४७.२ | ३४ |
| भंडारा | ४६.६ | ३२.४ |
| बुलढाणा | ४३.१ | २९.४ |
| चंद्रपूर | ४६.५ | ३३.९ |
| चेन्नई | ४१.९ | ३४.३ |
| नवी दिल्ली | ४५.५ | ३३.२ |
| धुळे | ४४.६ | ३०.७ |
| गोंदिया | ४४.७ | ३२.२ |
| जळगाव | ४३.७ | ३०.५ |
| कोल्हापूर | ३५.९ | २४.४ |
| लातूर | ४० | २५.९ |
| मुंबई | ४०.७ | ३७.९ |
| नागपूर | ४६.१ | ३३.२ |
| नांदेड | ४२.७ | ३०.४ |
| नंदूरबार | ३९.८ | २७.२ |
| नाशिक | ३७.५ | २५.९ |
| पुणे | ३५.९ | २४.५ |
| पंढरपूर | ४१.१ | २६ |
| सातारा | ३७.१ | २४.९ |
| सांगली | ३७.६ | २४.८ |
| सोलापूर | ४०.४ | २६.६ |
| वर्धा | ४५.४ | ३३.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण नवीन संबंधांचा फायदा होईल. धाडसाने कामे होणार नाही. काळजी घ्या.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व कामात वाढ होईल.अधिकारी वर्गाचे सहकार्य मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील. वादापासून दूर राहावयास हवे.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व प्रतिष्ठा वाढेल. सहकार्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल. धर्माविषयी आस्था वाढेल. कर्ज आणि खर्चात कपात करा.

**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल. आर्थिक स्थिती खालावलेली असेल.

**कर्क :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल.

**मकर :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल.एखाद्या जवळच्याच्या व्यवहारात प्रतिकूलता येईल.


**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल. परिजनांमुळे तणाव होऊ शकतो.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम मुलांमुळे तणाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.

**मीन :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील. अडचणी निर्माण होऊ शकतात.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७८



### आडवे शब्द

१. जतन, संवर्धन
५. रसाळ
८. निर्लज्ज
१२. मृत्यूचा राजा
१३. वेदना
१५. बरोबर आलेला फौजफाटा
१७. यात्रेस जाणे
१८. प्रभात
१९. सय, आठवण
२०. क्षणजीवी
२२. काजळ, सुरमा इ. प्रकार
२४. बंदी, हरकत
२५. आदर, प्रतिष्ठा
२७. मार्ग, रस्ता
३१. सावध नसणे
३३. नवरा, पती
३५. लहान
३६. प्रजा, लोक
३८. तीव्र ऊन
४०. पर्वत
४१. आजपर्यंत
४४. पैगंबर यांच्या नावामागे लावण्याची उपाधी
४६. ठोक! हाण!
४७. त्वरित
५१. सर्प
५३. आघात, घाव
५४. चिकटविणे
५५. महादेवाचे वाहन
५८. काळ्या तोंडाचे माकड
५९. जननी, जन्म देणारी
६०. रात्र
६१. लोखंड
६२. अजाणता
६४. त्रासणे, वेतागणे
६५. लग्नाचा उडवतात, तंबाखूचा भरतात
६६. फुरसत
६८. विंचवाचा दंश करण्याचा अवयव
६९. डौलदार, वक्र
७१. रम्य, सुखद
७३. 'सबका मालिक एक' सांगणारे संत
७४. पुत्र, मुलगा
७५. आदित्यवार

### उभे शब्द

२. रसाचा आंबा
३. सारखा
४. श्री विष्णूचा अष्टाक्षरी मंत्र
६. मंत्रीमंडळ
७. तेज, कांती
८. आवाज, स्वर
९. ढग (संस्कृत)
१०. पोपट
११. सरहद्द
१४. सिद्ध, राजी
१६. शास्त्रीजींची घोषणा
१७. बातमीदार
१८. गुणांसह, निर्गुणच्या विरुद्ध
२०. काम करण्याची ताकद
२१. जप्ती
२३. अभिनेता
२५. मीन
२६. कल्हईसाठी उपयोगी क्षार
२९. मृत्यू
३०. मला
३१. ताई (गुजराथी)
३४. फक्त, केवळ
३७. नम्र, वाकलेला
३८. प्रत्येक कुळाशी वेगवेगळा केलेला करार
३९. धोबी
४०. टक, दृष्टी
४२. चित्रपटातील नटी
४३. नरमच्या विरुद्ध
४५. त्रास
४८. भीती
४९. भिंतीतील कपाट
५०. काव्य
५२. अनुमती
५५. मागाहून
५६. ठोंब्या मनुष्य, बाईलबुद्ध्या
५७. उत्कर्षाचा काळ
५८. वाद्य वाजविण्याची कला
५९. मर्कट
६०. भूप, भूपती
६२. आश्चर्याची गोष्ट
६३. थेट, न थांबता सरळ
६४. निरुपयोगी
६७. वेळ (हिंदी)
६८. हल, एक शेतकी अवजार
६९. वडिलांचे एक संबोधन
७०. सेविका
७२. सूर्याचे एक नाव

### जम्बो शब्दकोडे क्र. ९७७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.करवत ४.छापाकाटा ८.झकपक ११.रसद १३.कचकच १६.नवलविशेष १९.कोमट २०.तूट २१.रस २३.रटरट २५.तमस २७.मस २९.वास ३०.कस ३१.रूटीन ३३.टर ३४.सहजासहजी ३६.नाट ३८.तरतम ४०.हमाल ४१.वन्य ४२.पार ४५.कान ४८.कालहरण ४९.झूला ५०.तमासगीर ५३.परवचा ५४.तळतळाट ५७.समतल ५८.रम ६०.फट ६१.कडेकडने ६३.पळापळ ६५.अट ६६.कसा ६८.प्रेमपत्र ७०.राजकन्या ७२.डमडम ७४.तंग ७५.नाक ७६.कलाकार ७९.नशा ८३.साष्टांग नमस्कार विनंती विशेष

उभे उत्तर : १.फुरफुर २.रस ३.वदन ५.पावशेर ६.टाप ७.रकम ९.करतूत १०.कडे १२.खोल १४.चकोट १५.चटपटीत १७.वर १८.षटक २०अ.टमटम २२.समसमान २४.रसना २६.टर २८.सहल २९.वासरु २९अ.सह ३२.नर ३५.जीव ३७.टपाल ३९.तऱ्हा ४०.हकालपट्टी ४३.रहस्य ४४.हलाहल ४६.समाचारपत्र ४७.संगीत ४८.कावळा ५०.तव ५१.रळफळ ५२.सामने ५५.तट ५६.टकटक ५७.सडेतोड ५९.मळा ६२.दम ६४.पलंग ६५.अज ६६.कडक ६७.साम ६८.प्रेक्षक ७०.राधेशाम ७१.न्यायी ७३.मना ७७.लाडू ७८.रसा ७९.नन ८०.मोर ८१.कुंती ८२.मेष

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने 12 कोटीची फसवणूक




पुणे (दैनिक संध्या) : शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास दरमहा पाच टक्के परतावा देण्याच्या आमिषाने १२ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आतापर्यंत आरोपीने ४५ गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे.याबाबत गणेश अनिल घोलप (रा. धनगर आळी, गुरुवार पेठ) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एकाविरुद्ध महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंरक्षण कायद्यान्वये (एमपीआयडी) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी बावधन परिसरात राहायला आहे. आरोपीशी घोलप यांची ओळख झाली होती. त्या वेळी आरोपीने 'राजपूत वाईज इन्व्हेस्टमेंट 'नावाची कंपनी असून, संबंधित कंपनीला 'सेबी'ची मान्यता असल्याची बतावणी केली होती. संबंधित कंपनीकडून शेअर बाजारात गुंतवणूक केली जाते. आरोपीने २०२२ ते २०२५ या कालावधीत घोलप यांच्यासह अन्य गुंतवणुकदारांकडून मोठ्या प्रमाणावर पैसे घेतले.

### पुणे शहरात 15 ते 24 जूनदरम्यान जड-अवजड वाहनांच्या प्रवेशास बंदी

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरातील वाहतूक कोंडीतून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम ११५ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत जड, अवजड व मल्टी ॲक्सल वाहनांच्या प्रवेशावर तात्पुरती बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार दि. १५ जून २०२६ रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते दि. २४ जून २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत पुणे शहरातून इतर शहरांकडे जाणाऱ्या जड-अवजड वाहनांना शहरात प्रवेश करता येणार नाही. संबंधित वाहनांसाठी सोलापूर, मुंबई, अहिल्यानगर, सासवड, चाकण, शिक्रापूर, तळेगाव, जेजुरी, सुपे आदी मार्गांद्वारे पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. शहरात माल उतरविणे अथवा माल भरून इतरत्र जाणे आवश्यक असलेल्या तसेच अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या वाहनांनी वाहतूक शाखा, पुणे शहर यांची ७२ तास अगोदर परवानगी घेऊन रात्री ११ ते सकाळी ६ वाजेदरम्यान निर्धारित पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, पेट्रोल, डिझेल, दूध, शेतीमाल आदी अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या वाहनांना या बंदी आदेशातून वगळण्यात आले आहे. नागरिकांनी व वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून वाहतूक व्यवस्थेस सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

### रोजगार मेळावा 16 जून रोजी

पुणे (दैनिक संध्या) : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे आणि अलार्ड युनिव्हर्सिटी, हिंजेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता अलार्ड युनिव्हर्सिटी, राजीव गांधी आयटी पार्क, हिंजेवाडी येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात पुणे जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील १४ नामांकित उद्योजक सहभागी होणार असून, ६९२ हून अधिक रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. टेक्निकल मॅनेजर, आर्किटेक्ट, सॉफ्टवेअर इंजिनिअर, वेब डेव्हलपर, आयटी डेव्हलपमेंट, बीपीओ (व्हॉइस/नॉन-व्हॉइस), मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल इंजिनिअर, क्वालिटी कंट्रोल इंजिनिअर, क्वालिटी इन्स्पेक्टर तसेच पदवीधर व डिप्लोमाधारक उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांच्या माहितीसाठी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज करावा. तसेच दि. १६ जून रोजी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती व बायोडाटा (रेझ्युमे) सोबत घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ०२०-२६१३३६०६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

### रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेला प्रारंभ

पुणे (दैनिक संध्या) : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर सुरू केली आहे. लक्ष्यांकित उद्दिष्टांची शंभर टक्के पूर्तता करण्यासाठी विभागाने काटेकोर नियोजन केले असून, सर्व पशुपालकांनी या मोहिमेत सहभागी होऊन आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. घटसर्प (एचएस) आणि फऱ्या (बीक्यू) यांसारख्या घातक आजारांवर नियंत्रणासाठी लसींची शीतसाखळी व्यवस्थापन व्यवस्था सक्षम करण्यात आली असून, जिल्हा व तालुका स्तरावर पुरेशा प्रमाणात लसींचा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके गावागावांत जाऊन 'डोअर स्टेप' पद्धतीने लसीकरण करीत आहेत. पावसाळ्यात रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेता, पशुपालकांनी गाई, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्यांचे लसीकरण करून घेण्यासाठी जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कटफळ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा विकसित करा

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार**

पुणे (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील कटफळ येथे २० एकर जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा विकसित करण्यात येत आहे. क्रीडा सुविधा विकसित करताना सर्व क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात यावा, या ठिकाणी राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित होतील, याद्दष्टीनेही कामे करावीत, असे निर्देश राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

विधानभवन येथील झुंबर सभागृह येथे जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या आढावा आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार शंकर मांडेकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, क्रीडा उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, तालुका



क्रीडा अधिकारी महेश चावले, क्रीडा संकुल समितीचे सदस्य आदी उपस्थित होते. श्रीमती पवार म्हणाल्या, कै भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धेचे बारामती येथे आयोजन करण्याबाबत प्रास्तावित करण्यात आले असून येत्याकाळात पर्जन्यमान, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा तसेच पालखी सोहळ्याचा विचार करुन स्पर्धा आयोजनाबाबत तारीख निश्चित करावी. जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या बैठकीत जिल्हा क्रीडा संकुल पुणे (बारामती) देखभाल दुरुस्तीबाबत आराखडा तयार करुन सादर करावा. बैठकीत क्रीडा विषयाच्या अनुषंगाने विविध बाबींवर चर्चा करण्यात आली, सकारात्मक चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. जिल्हा क्रीडा संकुलामध्ये खेळाडूंना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. प्रतिभावंत खेळाडू घडविण्यावर क्रीडा विभागाने भर द्यावा, असेही श्रीमती पवार म्हणाल्या. या बैठकीत श्री. लकडे यांनी क्रीडा संकुल देखभाल दुरुस्ती, नवीन क्रीडा साहित्य खरेदी, सार्वजनिक बांधकाम विभागाला लागणारा निधी वर्ग करणे आदी विषयांवर माहिती आली.

यावेळी श्रीमती पवार यांच्या हस्ते हिंद केसरी महेंद्र गायकवाड, जागतिक योगासन स्पर्धेत सुवर्णपदक विजेता नितीन पवळे, गोकर्ण शर्मा तसेच जागतिक ट्रेडीशनल ग्रुप व हँडसेट खेळात सुवर्णपदक विजेता निरल वाडेकर यांचा सत्कार करण्यात आला.

## पुण्यातील तरुणीची उत्तुंग भरारी अमेरिकन कंपनीच्या एच आर डिपार्टमेंटमध्ये भारतात प्रथम

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील कल्याणी नगर भागामध्ये नामवंत अशी एक्सप्रेस आयटी मॅनपॉवर ग्रुप या कंपनीच्या एच आर डिपार्टमेंट मध्ये काम करणारी ऋतुजा कुंभार या मराठी मुलीने आपल्या कौशल्याने संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. अनेक उच्चशिक्षित मुला मुलींना आयटीमध्ये रोजगार देणाऱ्या एच आर डिपार्टमेंट मध्ये ऋतुजा काम करत असून या कंपनीचा विस्तार जगभरातील सुमारे 50 देशांमध्ये आहे.ही कंपनी संपूर्ण जगभरात मनुष्यबळ पुरवते यामध्ये आयटी इंजिनियर्स, असिस्टंट,सॉफ्टवेअर डेव्हलपर्स,आयटी एक्झिक्यूटिव्ह या स्वरूपामध्ये माहिती तंत्रज्ञानात ही कंपनी अव्वल असून ऋतुजा कुंभार व त्यांच्या टीम ने हे यश सहज शक्य केले आहे.जगभरात युद्धजन्य




परिस्थिती असताना देखील या कंपनीच्या एच आर डिपार्टमेंटने जगभरात कुशल मनुष्यबळ कमीत कमी वेळात पुरवून हजारो तरुण-तरुणींना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.या योगदानाबद्दल एक्सप्रेस आयटी मॅनपॉवर ने ऋतुजा कुंभार यांचा अच्युवर्स ऑफ द इयर या पुरस्काराने सन्मानित केले आहे. याबाबत बोलताना ऋतुजा कुंभार यांनी सांगितले की हे माझे यश नसून संपूर्ण टीमचे योगदान आहे व त्यांनी वरिष्ठांचे आभार व्यक्त केले.

## आरामदायी आणि स्टायलिश : 'स्टेट ऑफ जॉय'ची भारतात दमदार एंट्री

पुणे (दै. संध्या)

देशातील पादत्राणांच्या बाजारपेठेत नवीन पर्वाची सुरुवात करत 'स्टेट ऑफ जॉय' या प्रीमियम स्नीकर ब्रँडने भारतात आपल्या उत्पादनांचे अधिकृत लाँच केले आहे. आराम, शैली आणि वैयक्तिक अभिव्यक्ती यांचा संगम घडवून आणणाऱ्या या ब्रँडकडून भारतीय ग्राहकांना नव्या प्रकारचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पादत्राणे क्षेत्रातील अनुभवी उद्योजक पुल्लेला गोपालकृष्ण बाची आणि दासरी राजू रमेश यांनी 'स्टेट ऑफ जॉय'ची स्थापना केली आहे. दैनंदिन वापरातील पादत्राणांची व्याख्या बदलण्याच्या उद्देशाने हा ब्रँड बाजारात उतरला असून, आधुनिक जीवनशैलीला साजेशी रचनात्मक आणि आरामदायी स्नीकर्स ग्राहकांसमोर आणण्यात आली आहेत.

ब्रँडच्या उत्पादनांची निर्मिती



'ॲनाटॉमी-फर्स्ट' अर्थात पायांच्या नैसर्गिक रचनेला प्राधान्य देणाऱ्या संकल्पनेवर आधारित आहे. त्यामुळे दिवसभर वापर करताना आराम, आधार आणि सहज हालचालींचा अनुभव मिळावा यावर विशेष भर देण्यात आला आहे. आधुनिक फॅशन आणि कार्यक्षमतेचा समतोल साधत तयार करण्यात आलेल्या या स्नीकर्समुळे ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण होतील, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे.

विशेष म्हणजे 'स्टेट ऑफ जॉय' हा केवळ पादत्राणांचा ब्रँड नसून, तो 'जॉय सबकल्चर' या संकल्पनेद्वारे एक सामाजिक आणि सर्जनशील चळवळ उभी करण्याचा प्रयत्न करत आहे. कलाकार, स्वप्नाळू व्यक्ती, नवकल्पनांना प्रोत्साहन देणारे विचारवंत आणि स्वतःची वेगळी ओळख जपणाऱ्या तरुणांना एकत्र आणून आनंद, सर्जनशीलता आणि अस्सल अभिव्यक्तीचा उत्सव साजरा करण्याचे ध्येय या उपक्रमामागे आहे.

देशभरातील ८०० हून अधिक प्रीमियम रिटेल स्टोअर्स आणि ३,००० पेक्षा जास्त मल्टी-ब्रँड स्टोअर्समध्ये उपलब्धतेसह कंपनीने मजबूत ओम्नीचॅनेल विस्तार धोरण आखले आहे. याशिवाय, स्वतःच्या एक्सक्लुझिव्ह ब्रँड आउटलेट्सच्या माध्यमातूनही ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना संस्थापक पुल्लेला गोपालकृष्ण बाची म्हणाले, "पादत्राणे दिसायला आकर्षक असण्याबरोबरच ती घालणाऱ्याला दिवसभर सुखद अनुभव देणारी असावीत, या विश्वासातून 'स्टेट ऑफ जॉय'ची निर्मिती झाली आहे. आमच्या डिझाइन केलेल्या शूजद्वारे नैसर्गिक हालचालींना पूरक आराम देण्याबरोबरच व्यक्तिमत्त्व, अस्सलपणा आणि आनंद साजरा करणारा ब्रँड निर्माण करण्याचे आमचे ध्येय आहे. भारतभर लाँच होत असताना आधुनिक भारताचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि चैतन्य प्रतिबिंबित करणारा समुदाय उभारण्यास आम्ही उत्सुक आहोत."

भारतीय ग्राहकांच्या बदलत्या पसंती आणि वाढत्या स्नीकर संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर 'स्टेट ऑफ जॉय'चे आगमन पादत्राणे उद्योगासाठी महत्त्वपूर्ण मानले जात असून, आगामी काळात हा ब्रँड बाजारपेठेत आपली वेगळी ओळख निर्माण करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजनेअंतर्गत जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण रस्ते निर्माण करावेत : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

पुणे (दै. संध्या)

शेत रस्ते हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांचा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये समावेश करण्यात यावा, असे निर्देश राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. जिल्ह्यात अधिकाधिक रस्ते निर्माण करण्यात यावेत, याकरिता निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची बैठक विधानभवन येथील झुंबर सभागृह येथे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, यावेळी आमदार



शंकर मांडेकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपजिल्हाधिकारी डॉ. चारुशिला देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सदस्य आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविणारी योजना आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दर्जेदार रस्ते मिळणार आहेत. रस्त्याची कामे पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या समस्या सुटण्यासह त्यांच्यामध्ये समाधानाची भावना निर्माण होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण व दर्जेदार रस्ते निर्माण करण्याकरिता सर्वांनी मिळून प्रयत्न करुया, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले. योजनेच्या प्रगतीचा आढावा दरमहा बैठक आयोजित घेण्यात येईल, जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीस जिल्ह्यातील आमदारांना निमंत्रित करावे, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

यावेळी श्री. जगदाळे यांनी या योजनेअंतर्गत विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांचा समावेश करण्याबाबत सूचना केली. जिल्ह्यात रस्ते निर्मितीच्या कार्यात सहकार्य करण्यात येईल, असेही श्री. जगदाळे म्हणाले.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाबाबत संगणकीय सादरीकरण केले. जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने निश्चित केलेले कंत्राटदारांची सूची (पॅनल), कमी दराची निविदा (एल १) दर, मोजणी करुन निश्चित केलेले ५०५ रस्ते आदीबाबत माहिती दिली तसेच मोजणी झालेल्या रस्त्यांचे आठवड्याभरात काम सुरु करणार असल्याचे श्री. डुडी यांनी सांगितले.

## 'आर्यभट्ट' यांच्या विडंबनप्रकरणी ॲमेझॉन इंडियाला कायदेशीर नोटीस!

पुणे (दै. संध्या)

प्राचीन भारताचे महान गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ 'आर्यभट्ट' यांचे व्यावसायिक जाहिरातीत अत्यंत हीन पातळीवर विडंबन केल्याप्रकरणी ई-कॉमर्स क्षेत्रातील नामांकित कंपनी 'ॲमेझॉन इंडिया'ला कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयात कार्यरत असणाऱ्या हिंदु जनजागृती समितीच्या अधिवक्त्या अमिता सचदेवा यांनी ही नोटीस बजावली असून ॲमेझॉनने ४८ तासांत भारतीय जनतेची जाहीर माफी मागून ही वादग्रस्त जाहिरात तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी केली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास ॲमेझॉन विरोधात फौजदारी आणि दिवाणी खटला दाखल केला जाईल, असा स्पष्ट इशारा नोटीसच्या माध्यमातून दिला आहे. दरम्यान या जाहिरातीमुळे देशभरातील राष्ट्रप्रेमी नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, सामाजिक माध्यमांवर ॲमेझॉन वर बहिष्काराची (#Boycott_Amazon) ऑनलाईन मोहीम प्रचंड वेगाने पसरत आहे. या जाहिरातीत आर्यभट्ट यांच्या वेशातील एका व्यक्तीला उभे करून त्यांना 'शून्य डिलिव्हरी चार्जेस शोधणारा शास्त्रज्ञ' अशा उपरोधिक आणि विनोदी स्वरूपात सादर करण्यात आले आहे. ज्या थोर ऋषितुल्य शास्त्रज्ञाने जगाला 'शून्याची' अमूल्य संकल्पना दिली आणि भारताचा वैज्ञानिक ध्वज जगभरात फडकावला, त्यांना केवळ एका व्यावसायिक फायद्यासाठी 'कॉर्पोरेट मस्कट' (विनोदी व्यावसायिक पात्र) बनवून त्यांची क्रूर थट्टा उडवणे हा भारताच्या महान ज्ञान-वारशाचा आणि राष्ट्रीय अस्मितेचा जाणीवपूर्वक केलेला अवमान असल्याचे या नोटीशीमध्ये म्हटले आहे.

# पुणे ग्रँड टूर स्पर्धेच्या अनुषंगाने नियामक परिषद स्थापन करावी – उपमुख्यमंत्री

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी घेतला 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धेच्या पूर्वतयारीचा आढावा**

पुणे (दै. संध्या)

यावर्षी आयोजित केलेल्या पहिल्या 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धेच्या यशस्वी आयोजनातून आपण एक आंतरराष्ट्रीय दर्जाचा उपक्रम उभा करण्याचे आव्हान अत्यंत कमी कालावधीत साध्य केले. आता पुढील वर्षीच्या दुसऱ्या पर्वाच्या आयोजनाच्या माध्यमातून या स्पर्धेची उंची, दर्जा, व्याप्ती आणि प्रभाव अजून पुढे न्यायचा असून नवा मापदंड निर्माण करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. तयारीचा आढावा व निर्णय घेण्यासाठी नियामक परिषद स्थापन करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित 'पुणे ग्रँड टूर' सायकल स्पर्धेच्या आढावा बैठकीत त्या



मनपा आयुक्त श्री. राम, डॉ. सूर्यवंशी आदींनी माहिती दिली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्पर्धेच्या अनुषंगाने सादरीकरण केले. गतवेळी अत्यंत कमी कालावधीच्या तयारीत ही आंतरराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा आयोजित करण्यात आली. येथील गड-किल्ले, ऐतिहासिक वारसा, पर्यटनस्थळे या स्पर्धेमुळे जागतिक नकाशावर पोहोचली. अत्यंत यशस्वीरित्या व सुरक्षित स्पर्धा आयोजित केल्यामुळे 'युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनल' (युसीआय) या जागतिक संघटनेने आगामी स्पर्धेचा दर्जा युसीआय २.२ वरून २.१ असा उन्नत केला आहे. गतवर्षीच्या 4 च्या तुलनेत यावर्षी स्पर्धेचे 6 टप्पे असणार असून 1 हजार 99 कि.मी.ची ही स्पर्धा असणार आहे, असे त्यांनी सांगितले. बैठकीत, गतवर्षी अतिशय चांगले आयोजन केल्याबद्दल प्रातिनिधिक स्वरूपात अंमलबजावणी यंत्रणांचा सत्कार करण्यात आला.

बोलत होत्या. यावेळी पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार शंकर मांडेकर, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, क्रीडा व युवक सेवा आयुक्त दीपक सिंगला, पीएमआरडीएच्या अतिरीक्त आयुक्त मंजुलक्ष्मी के., अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, सीएफआयचे महासचिव मनिंदर पाल सिंह (दूरदृष्य प्रणालीद्वारे) आदी उपस्थित होते.

ग्रँड टूर २०२७ चे उद्दिष्ट केवळ गेल्या वर्षाची पुनरावृत्ती करणे एवढेच नसल्याचे सांगून उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, अगदी शहरापासून ग्रामीण भागापर्यंत, तळागाळापर्यंत ही स्पर्धा पोहोचलेल्या गतवर्षीच्या 'पुणे ग्रँड टूर'चा आनंद सर्वांनी घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठबळाने ही स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली. या ग्रँड टूरची संकल्पना, त्यामागील दूरदृष्टी आणि उपक्रम प्रत्यक्षात आणण्याचा पाया तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांनी रचला. पुणे हे केवळ शैक्षणिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक केंद्र न राहता जागतिक दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनावं, महाराष्ट्रातील युवकांना सायकलिंगसारख्या उत्कृष्ट क्रीडा प्रकारांसाठी व्यासपीठ मिळावे आणि पुण्याचे आंतरराष्ट्रीय क्रीडा नकाशावर आपले वेगळे स्थान निर्माण व्हावे ही त्यांची दूरदृष्टी होती, असेही त्या म्हणाल्या. सर्व विभाग, अधिकारी, कर्मचारी, स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा, स्वयंसेवक आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे पदाधिकारी आदी अनेक यंत्रणा, विभाग, विविध भागधारक यांनी मर्यादित कालावधीमध्ये एकत्र येऊन अतिशय उत्तमरित्या काम केल्याने ही अतिशय सुंदर अशी स्पर्धा पार पडली, असेही त्या म्हणाल्या. आगामी स्पर्धेमुळेही आपल्या ऐतिहासिक वास्तू, ऐतिहासिक स्थळे जगाच्या पटलावर येऊन पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आगामी स्पर्धेसाठी राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी संस्था आणि सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाची नियामक परिषद (गव्हर्निंग कौन्सिल) स्थापन करण्यात यावी. गव्हर्निंग कौन्सिलने दरमहा बैठक घेऊन तयारीचा प्रगतीचा आढावा घ्यावा. ही परिषद पुणे टूरची सर्वोच्च धोरणात्मक आणि देखरेख करणारी संस्था असावी. त्यासोबतच आयोजन समितीही स्थापन करण्यात यावी, असेही त्या म्हणाल्या. त्यात प्रत्येक समिती, प्रत्येक विभाग आणि प्रत्येक अधिकाऱ्याच्या भूमिका, जबाबदाऱ्या, अधिकार आणि स्पष्टपणे निश्चित करण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले. स्पर्धेच्या आयोजनासाठी राज्य शासनाकडून निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. परंतु, यावर्षीच्या स्पर्धेचे क्षेत्र मोठे असून स्पर्धेच्या निधीसाठी सर्व महानगरपालिका तसेच अन्य यंत्रणांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, असेही मत त्यांनी मांडले.

विभागीय आयुक्त श्रीमती तेली- उगले म्हणाल्या, या स्पर्धेसाठी स्वच्छता ही आपली सामाजिक जबाबदारी म्हणून ती हाती घेतली पाहिजे. स्पर्धा जाणाऱ्या गावातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प बाबत प्रायोगिक तत्त्वावर राबविले पाहिजेत. त्यासाठी कचऱ्याचे घनीकरण (कॉम्पॅक्टिंग) करण्याचे प्रकल्प राबवून तो कचरा जवळच्या शहरांच्या कचरा डेपोंना पाठवता येऊ शकतात. स्पर्धेसाठी इको टुरिझम अंतर्गत बांबूच्या वस्तू तयार करून वापर करता येईल, असेही त्या म्हणाल्या.

पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार म्हणाले, गतवेळच्या स्पर्धेसाठी पोलीस दलाला मोठ्या प्रमाणात साहित्य, वाहने वेळेत उपलब्ध करून देण्यात आली. यावर्षीच्या स्पर्धेत अजून लोकांचा सहभाग वाढेल असे प्रयत्न आहेत. स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्याचा दिवस सुट्टीचा असल्याने वाहतूक नियमन करणे सोपे होणार आहे, असेही ते म्हणाले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

## आयडीबीआय बँके तर्फे आयडीबीआय इन्नोव्हेशन 2026 या हॅकेथॉनचे आयोजन

मुंबई (दैनिक संध्या) : आयडीबीआय बँके तर्फे आज त्यांच्या हॅकेथॉन "आयडीबीआय इन्नोव्हेट २०२६" या भविष्याभिमुख दृष्टिकोनाशी संबंधित अशा उपक्रमाची घोषणा केली असून या अंतर्गत बँकिंग पध्दतींमधील नाविन्य वाढून डिजिटल बदलांना चालना देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन आयडीबीआय बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. राकेश शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले, यामुळे आता पुढील पिढीतील तंत्रज्ञानाचा वापर बँकिंग क्षेत्रात आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना चालना मिळेल. 'बिल्ड, इंटिग्रेट, ट्रान्सफॉर्म' विषयावर आधारीत या हॅकेथॉनमध्ये संपूर्ण भारतातील स्टार्ट अप्स, फिनटेक्स, डेव्हलपर्स आणि इन्नोव्हेटर्स कडून सहभागी होण्यास निमंत्रण देण्यात येत आहे. या उपक्रमाचे डिझाईन हे कलात्मकता वाढून तंत्रज्ञानातील कौशल्याचा वापर करुन बँकिंग क्षेत्राला भेडसावणाऱ्या जगातील प्रत्यक्ष सस्यांवर उपाय शोधण्यासाठी करण्यात आले आहे. याप्रसंगी बोलतांना आयडीबीआय बँकेचे एमडी आणि सीईओ श्री राकेश शर्मा यांनी सांगितले : " आयडीबीआय इन्नोव्हेट २०२६' च्या माध्यमातून, बँकिंग सेवांचे स्वरूप नव्याने घडवण्यासाठी प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि नाविन्यपूर्ण कल्पनांचा संगम घडवून आणणारे प्रभावी उपाय विकसित करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. ही हॅकेथॉन डिजिटल क्षेत्रातील उत्कृष्टतेप्रती आणि ग्राहकाभिमुख नाविन्यपूर्णतेप्रती असलेली आमची वचनबध्दता अधोरेखित करते."

## एथर एनर्जीकडून स्कूटरसाठी आवाजाधारित व्हॉईस ऑन एथर संवाद सुविधा सादर



पुणे (दैनिक संध्या) : एथर एनर्जी ने आपल्या जेन ३ आणि त्यापुढील स्कूटर्ससाठी 'व्हॉईस ऑन एथर' ही नवी आवाजाधारित सुविधा सादर केली आहे. दूरस्थ पद्धतीने दिल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअर अद्ययावत सुविधेद्वारे ही सेवा ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे हजारो विद्यमान ग्राहकांना स्कूटरशी थेट आवाजातून संवाद साधण्याची सुविधा मिळणार आहे. कंपनीचे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण मेहता यांनी समाजमाध्यम 'एक्स'वर या सुविधेची घोषणा केली. भविष्यात वाहन चालविताना चालकांना पडद्याकडे वारंवार पाहण्याची आवश्यकता उरणार नसल्याचे त्यांनी नमूद केले. कनेक्टेड तंत्रज्ञानावर सातत्याने भर देणाऱ्या एथरने यापूर्वी स्पर्शाधारित डिजिटल दर्शकफलक असलेली विद्युत स्कूटर बाजारात आणली होती. आता आवाजाधारित सुविधेमुळे वाहनाशी संवाद अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. ही सुविधा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित असून चालकांच्या नैसर्गिक बोलण्याची पद्धत समजून घेण्यासाठी तयार करण्यात आली आहे. एथरच्या स्मार्ट शिरस्त्राणासह किंवा सुसंगत बिनतारी ध्वनीसाधनाद्वारे ही सेवा वापरता येणार आहे. चालकांना आता विविध आदेश केवळ बोलून देता येतील. या सुविधेद्वारे मार्गदर्शन, वाहन मांडणी, दूरध्वनी संवाद तसेच संगीत नियंत्रण यांसारख्या अनेक सेवा हाताळता येणार आहेत. चालकांना गंतव्यस्थान शोधणे, मार्ग सुरू करणे, जवळील विद्युत भरणा केंद्र शोधणे, प्रवासाचा अंदाजित कालावधी तपासणे आणि मार्गाविषयी माहिती मिळवणे शक्य होणार आहे. तसेच दर्शकफलकाची प्रकाशमानता, पकड नियंत्रण व्यवस्था आणि 'मॅजिक ट्विस्ट'सारख्या वैशिष्ट्यांमध्येही आवाजातून बदल करता येणार आहेत.वाहन चालविताना पडद्याला स्पर्श करण्याची किंवा वारंवार नजर टाकण्याची गरज कमी होणार असल्याने गर्दीच्या वाहतुकीत ही सुविधा अधिक उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे.

## युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी डाबर ग्लुकोजची 'एनर्जाईज इंडिया' मोहिम सुरु



पुणे (दैनिक संध्या) : डाबर समूहाचा आघाडीचा इंस्टंट एनर्जी ड्रिंक ब्रँड डाबर ग्लुकोज याने आज देशभरातील प्रमुख क्रीडा अकादम्यांमधील युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आणि ऊर्जा व स्टॅमिनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी 'एनर्जाईज इंडिया' या भव्य मोहिमेची घोषणा केली. या मोहिमेअंतर्गत डाबर ग्लुकोजने आज पुण्यातील स्टार बॉक्सिंग अकादमी येथे ऊर्जा आणि स्टॅमिना व्यवस्थापनाविषयी विशेष जनजागृती सत्राचे आयोजन केले. या सत्रात क्षेत्रातील नामांकित डॉक्टर आणि तज्ज्ञ सहभागी झाले होते. त्यांनी खेळाडूंना त्यांच्या कामगिरीत सुधारणा करण्यासाठी आणि पूर्ण क्षमतेने खेळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व महत्त्वपूर्ण माहिती दिली. यावेळी डाबरतर्फे अकादमीतील उत्कृष्ट खेळाडूंचा सन्मानही करण्यात आला. यावेळी बोलताना डाबर इंडिया लिमिटेडचे हेल्थ सप्लिमेंट्स विभागाचे मार्केटिंग प्रमुख श्री. अमित गर्ग म्हणाले, "युवा खेळाडूंमध्ये ऊर्जा आणि स्टॅमिनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी तसेच त्यांना त्यांच्या खेळात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक ऊर्जा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही 'एनर्जाईज इंडिया' मोहिमेची सुरुवात करत आहोत, याचा आम्हाला आनंद आहे. डाबर ग्लुकोज हा खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि सक्रिय जीवनशैली जगणाऱ्या व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त असा ब्रँड आहे. शारीरिक हालचालींमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींना तत्काळ ऊर्जा मिळणे आवश्यक असते आणि डाबर ग्लुकोज त्यासाठी आदर्श पर्याय आहे."

## बैलजोडी वादावर 48 तासांत सन्मानाचा मार्ग शोधणार; उमेश रानवडे यांचे उपोषण मागे



आळंदी (दैनिक संध्या) : बैलजोडी निवड प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या वादाला अखेर संवादाचा मार्ग मिळाला असून, पुढील ४८ तासांत सन्मानपूर्वक तोडगा काढण्याच्या आश्वासनानंतर उमेश रानवडे यांनी सुरू केलेले बहुचर्चित बेमुदत उपोषण मागे घेतले. उपोषण स्थगितीच्या वेळी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ, बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, सदस्य विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे, रामभाऊ भोसले, रमेश कुऱ्हाडे, व्यवस्थापक माऊली वीर तसेच माजी नगराध्यक्ष व मानकरी राहुल चिताळकर पाटील उपस्थित होते. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी उपोषणकर्ते उमेश रानवडे, माजी नगराध्यक्ष व मानकरी राहुल चिताळकर पाटील, देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ, पालखी सोहळा प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप आणि बैलजोडी समितीचे प्रतिनिधी नंदकुमार कुऱ्हाडे यांच्यात चर्चा होणार असल्याचे निश्चित करण्यात आले. संबंधित सर्व घटकांनी समन्वयाने आणि परस्पर सहमतीने मार्ग काढण्याचे मान्य केले. वादग्रस्त मुद्द्यावर ४८ तासांच्या आत योग्य आणि सन्मानजनक निर्णय घेण्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आले. त्यानंतर उमेश रानवडे यांनी आपले बेमुदत उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला.

# 'अब होगा हिसाब' १८ जूनपासून

मुंबई (दै. संध्या) :

■ अविनाश मिश्रा करणार ओटीटीवर पदार्पण

■ 'अब होगा हिसाब' 18 जूनपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत पाहता येणार




भारतातील आघाडीची मोफत, प्रीमियम आणि जाहिरात-आधारित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने आपल्या बहुप्रतीक्षित 'अब होगा हिसाब' या ओरिजिनल सूडकथेवर आधारित सारिजचा ट्रेलर प्रदर्शित केला आहे. पंजाबच्या पार्श्वभूमीवर घडणारी ही सीरिज बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांच्या आयुष्याभोवती फिरते. एका घटनेमुळे त्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडतो. "आपल्या माणसांसाठी तुम्ही कोणती पातळी गाठू शकता?" हा या सीरिजमधील मध्यवर्ती प्रश्न आहे. आरे स्टुडिओची निर्मिती असलेल्या या सीरिजमध्ये संजय कपूर आणि शाहीर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. त्यांच्यासोबत मौनी रॉय, अविनाश मिश्रा, निमृत कौर अहलुवालिया, हरमन सिंघा आणि आशीमा वर्दान हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. 'अब होगा हिसाब' ही सीरिज 18 जूनपासून ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर मोफत स्ट्रीम होणार आहे.

शाहीर आणि अविनाश मिश्रा यांनी साकारलेल्या बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांची कथा ट्रेलरमध्ये पाहायला मिळते. आपल्या धाकट्या भावाला चांगले भविष्य मिळावे यासाठी बॉबी त्याला परदेशात पाठवण्याचे स्वप्न पाहत असतो. मात्र हे स्वप्न लवकरच भयानक वळण घेते. गूढरीत्या लोक बेपत्ता होण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, संजय कपूर यांनी साकारलेला प्रभावशाली गोल्डी बंटीला एक आकर्षक संधी देतो. त्यानंतर बंटी अचानक बेपत्ता होतो आणि अशा रहस्यमयरीत्या गायब होणाऱ्या लोकांच्या वाढत्या यादीत त्याचेही नाव समाविष्ट होते. संशय, फसवणूक आणि खोट्या आरोपांच्या जाळ्यात अडकलेल्या बंटीला वाचवण्यासाठी बॉबीची धडपड सुरू होते आणि त्याच्यासाठी प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो. गुपिते उलगडत जातात आणि परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होते. अशा वेळी आपल्या भावाला वाचवण्यासाठी आणि सत्य समोर आणण्यासाठी बॉबी किती मोठे धोके पत्करेल, हा प्रश्न सीरिजमध्ये उभा राहतो.

ॲमेझॉन एमएक्स प्लेअरचे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, "'अब होगा हिसाब' ही भावांमधील नाते, सूड आणि त्यामधील गुंतागुंतीच्या भावनांची प्रभावी कथा आहे. संजय कपूर, शाहीर, मौनी रॉय, अविनाश मिश्रा आणि इतर अनेक प्रतिभावान कलाकारांच्या दमदार अभिनयामुळे ही सीरिज अधिक प्रभावी झाली आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरमध्ये आम्ही भारताच्या मातीत रुजलेल्या आणि देशभरातील प्रेक्षकांशी जोडल्या जाणाऱ्या कथा मोफत स्वरूपात सादर करण्यासाठी कटिबद्ध आहोत. 'अब होगा हिसाब' ही त्याच वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. वास्तवदर्शी कथनशैली आणि सर्वांना भावणाऱ्या विषयांची सांगड या सीरिजमध्ये घालण्यात आली आहे. या सारिजचा ट्रेलर सादर करताना आम्हाला आनंद होत असून, प्रेक्षकांनी या रोमांचक प्रवासाचा अनुभव घ्यावा, अशी आमची इच्छा आहे." या सारिजकडे आकर्षित होण्यामागील कारण सांगताना गोल्डीची भूमिका साकारणारे संजय कपूर म्हणाले, "'अब होगा हिसाब'मधील व्यक्तिरेखांची खोली आणि त्याचे गुंतागुंतीचे कथाविश्व यामुळे मी या सीरिजकडे आकर्षित झालो. या सीरिजमधील मला सर्वाधिक भावलेली गोष्ट म्हणजे नाती आणि भावबंध यांचे अतिशय सुंदर चित्रण. ही कथा अनेक स्तरांनी समृद्ध, अनपेक्षित घडामोडींनी भरलेली आणि सतत नवे वळण घेणारी आहे. ॲमेझॉन एमएक्स प्लेअरसोबत पुन्हा एकदा काम करताना मला आनंद होत आहे.

## व्हाईट मिसचीफ व्होडकाच्या नव्या आणि प्रीमियम अवताराचे अनावरण

नवी दिल्ली (दै. संध्या) :




भारतातील सर्वाधिक लोकप्रिय व्होडका ब्रँड्सपैकी एक असलेल्या व्हाईट मिसचीफ व्होडकाने आपल्या मुख्य पोर्टफोलिओमध्ये व्यापक ब्रँड रिवॅम्प आणि प्रीमियमायझेशनची घोषणा केली आहे. हा बदल ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून, अधिक दर्जेदार पण सहज आणि आनंददायी ड्रिंकिंग अनुभव शोधणाऱ्या नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी ब्रँडची नव्याने मांडणी करण्यात आली आहे. या नव्या पोर्टफोलिओमध्ये आकर्षक आणि आधुनिक पॅकेजिंग डिझाइन, अधिक प्रभावी व्हिज्युअल ओळख आणि अधिक स्मूथ व आधुनिक व्होडका अनुभव देण्यासाठी विकसित केलेले सुधारित लिक्विड प्रोफाइल समाविष्ट आहे. ब्रँडची युवा आणि उत्साही ओळख कायम ठेवत, नव्या व्हाईट मिसचीफ व्होडकाला अधिक प्रीमियम आणि आधुनिक रूप देण्यात आले आहे, जे बदलत्या ग्राहकांच्या पसंतीशी सुसंगत आहे. या बदलाबद्दल बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर-मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, "ही प्रीमियमायझेशन मोहीम आमच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. यामागील उद्दिष्ट म्हणजे आमचा पोर्टफोलिओ अधिक मजबूत करणे आणि भारतातील युवा प्रौढ ग्राहकांमध्ये आधुनिक व उच्च दर्जाच्या व्होडकासाठी वाढणारी मागणी पूर्ण करणे. व्हाईट मिसचीफला भारतीय व्होडका बाजारात नेहमीच मजबूत ग्राहक ओळख आणि सांस्कृतिक महत्त्व लाभले आहे. या रिवॅम्पद्वारे आम्ही आजच्या ग्राहकांसाठी ब्रँडची नव्याने कल्पना करत आहोत. नव्या आकर्षक लूकसह, अधिक स्मूथ लिक्विड अनुभव आणि प्रीमियम अपील देताना, ग्राहकांना आवडणारी ब्रँडची मजेशीर आणि युवा ओळख कायम ठेवली आहे." व्हाईट मिसचीफ व्होडका आता महाराष्ट्रभर ७५० मि.ली., १८० मि.ली. आणि ९० मि.ली. या पॅक साइजमध्ये उपलब्ध आहे.

## इंडियन कॅन्सर सोसायटीच्या 'उगम' उपक्रमाची १७ वर्षे पूर्ण



पुणे (दै. संध्या) :

कर्करोग नियंत्रणासाठी कार्य करणारी भारतातील पहिली स्वयंसेवी आणि ना-नफा तत्त्वावरील संस्था इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस) यांच्या प्रमुख बालक कर्करोग सर्व्हायव्हरशिप उपक्रम 'उगम'च्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुंबईतील ५२५ पेक्षा जास्त कर्करोग विजेते, त्यांचे कुटुंबीय, आरोग्यसेवा क्षेत्रातील तज्ज्ञ, समर्थक आणि हितचिंतक सहभागी झाले होते. २००९ मध्ये स्थापन झालेल्या 'उगम'ची पायाभरणी एका साध्या पण प्रभावी विश्वासावर झाली होती. कर्करोगावर मात करणे हा प्रवासाचा शेवट नसून, नव्या संधी, स्वप्ने आणि उद्दिष्टांनी भरलेल्या आयुष्याची सुरुवात आहे. टाटा मेमोरियल रुग्णालयातील कर्करोग विजेत्यांच्या एका गटाने इंडियन कॅन्सर सोसायटीच्या स्वयंसेवी सहाय्य गटाच्या रूपाने या उपक्रमाची सुरुवात केली.

'उगम'च्या प्रेरणादायी प्रवासातून प्रेरणा घेत इंडियन कॅन्सर सोसायटीने देशभरात १९ ॲक्ट क्लिनिक्स सुर करण्यास मदत केली असून, त्यामध्ये ४,००० पेक्षा जास्त कर्करोग विजेत्यांची नोंदणी करण्यात आली आहे.



## गुंतवणुकीला वेग

पुणे (दै. संध्या) : भारतातील उद्योगक्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या प्रयोगात्मक टप्प्यातून बाहेर पडून प्रत्यक्ष व्यावसायिक अंमलबजावणीकडे वेगाने वाटचाल करत असल्याचे सॅपच्या व्हॅल्यू ऑफ एआय रिपोर्ट २०२६ मध्ये स्पष्ट झाले आहे. ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्सच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या या अहवालानुसार भारतीय संस्था एआयमध्ये सुमारे २५.९ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक करण्याच्या तयारीत असून पुढील दोन वर्षांत त्यात ४५ टक्क्यांहून अधिक वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. १३ देशांतील २,६०० व्यावसायिक नेत्यांच्या सहभागातून करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात भारतातील २०० उद्योग प्रतिनिधींचा समावेश होता. अहवालानुसार, भारत हा एआयमध्ये संरचित पद्धतीने गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतीय उद्योगांपैकी ७१ टक्के कंपन्यांकडे स्वतंत्र एआय धोरण असून सध्या ३३ टक्के कामकाजात एआयचा वापर होत आहे. पुढील दोन वर्षांत हा आकडा ५१ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

सासवड विभागांतर्गत येणाऱ्या महावितरण कंपनीच्या सर्व ग्राहकांना कळविण्यात येते की, सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यातील आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन ग्राहक व नागरिकांच्या सोयीसाठी तसेच सुरक्षेच्या दृष्टीने सासवड विभागीय कार्यालयांतर्गत कार्यरत उपविभागीय अधिकारी व शाखाधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| अ. क्र. | उप विभाग | कर्मचारी नाव | हुद्दा | कामाचे ठिकाण | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सासवड | धीरजकुमार मनोज गायकवाड | उपकार्यकारी अभियंता | सासवड उप विभाग अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२०७ |
| २ | सासवड | रोहित अशोक डामसे | सहायक अभियंता | सासवड शहर शाखा | ७८७५७६८२१० |
| ३ | सासवड | अमोल रामचंद्र डेरे | सहायक अभियंता | दिवा शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२११ |
| ४ | सासवड | पियुष राजेश सूर्यवंशी | कनिष्ठ अभियंता | खळद शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२१२ |
| ५ | सासवड | सोमनाथ अशोक शिंदे | कनिष्ठ अभियंता | पुरंदर शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२०२ |
| ६ | सासवड | जीवन दिलीप ठोंबरे | सहायक अभियंता | राजेवाडी शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२१४ |
| ७ | सासवड | मनीषा नामदेव साबळे | कनिष्ठ अभियंता | वाघापूर शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२१५ |
| ८ | सासवड | दीपक विठ्ठल गोंधळेकर | सहायक अभियंता | चांबळी शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२१३ |
| ९ | निरा | शरद गोविंद अवताडे | उपकार्यकारी अभियंता | निरा उप विभाग अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२१६ |
| १० | निरा | अलिम हमिद मनियार | सहायक अभियंता | निरा शहर शाखा | ७८७५७६८२१८ |
| ११ | निरा | संतोष पोपट करनोर | सहायक अभियंता | जेजुरी शहर शाखा | ७८७५७६८२२० |
| १२ | निरा | श्रीरंग श्रीराम मुत्तेपवार | सहायक अभियंता | जेजुरी ग्रामीण शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२२१ |
| १३ | निरा | शशिकांत ज्ञानेश्वर बोधले | कनिष्ठ अभियंता | वाल्हा शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२१९ |
| १४ | निरा | विजयकुमार पांडुरंग कचरे | सहायक अभियंता | परिंचे शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८८८६ |
| १५ | भोर | अविनाश विलास वाघमारे | उपकार्यकारी अभियंता | भोर उप विभाग अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७८७६८२२३ |
| १६ | भोर | प्रविण लक्ष्मण गायकवाड | सहायक अभियंता | भोर ग्रा.२ शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२२७ |
| १७ | भोर | ऋषीकेश भिमराव नलावडे | सहायक अभियंता | भोर शहर | ७८७५७६८२२५ |
| १८ | भोर | कृशांत सुदाम लोहार | कनिष्ठ अभियंता | भोर ग्रा.१ शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२२६ |
| १९ | भोर | सागर प्रकाश पवार | कनिष्ठ अभियंता | हिरडोशी शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२२८ |
| २० | भोर | शिवानंद मलीकार्जुन पट्टणशेट्टी | कनिष्ठ अभियंता | किकवी शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२०१ |
| २१ | भोर | दिपाली उत्तमराव खवणे | कनिष्ठ अभियंता | भाटघर शाखा अंतर्गत येणारी सर्व गावे | ७८७५७६८२३० |

कार्यालयाचा पत्ता : कार्यकारी अभियंता, महावितरण, सासवड विभाग, पारगाव रोड, सासवड पुरंदर जि.पुणे.
(पीआरओ बोएमटीझेड/ ४६ /२०२६-२७) कार्यकारी अभियंता, सासवड विभाग

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक ललिता शंकर शितोळे यांची मौजे दापोडी, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्रं. १४१/३ मध्ये ०१ हेक्टर ६० आर क्षेत्र आहे. सदर मिळकतीबाबत मे. दुय्यम निबंधक केडगाव यांचे कार्यालयात दि. ०२.०२.२००७ रोजी नोंदविलेले साठेखत दस्त क्रं. ५५३/ २००७ व दि. २०.०२.२००७रोजी नोंदविलेले खरेदीखत दस्त क्रं. ८२३/ २००७ हे दोन्ही दस्त दापोडी ते केडगाव प्रवासादरम्यान हरविलेले आहे. सदर दस्त हरविले बाबतची तक्रार ललिता शितोळे यांनी यवत पोलीस स्टेशन येथे दि. ११.०६.२०२६ रोजी नोंदविलेली असून त्याचा गुर. नं. २८२/२०२६ असा आहे. सदर दस्त कोणाला मिळून आलेस त्यांनी वरील ठिकाणी संपर्क करावा ही विनंती.

सही/-
श्री. इंद्रजित विलास रगडे
ॲडव्होकेट
पत्ता - चौधरी प्लाझा, उरूळी कांचन, ता हवेली, जिल्हा - पुणे -
Contact No. - ९४२२३१३७८७ / ९७६५९१८७८७

## जाहीर नोटीस

मा. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचे कोर्टात.

क्र. फौज जन्म-मृत्यू/एसआ/482/25 — दिनांकः- 11.6.2026.
युसुफ महमंद शेख रा जुन्नर ता जुन्नर जि पुणे - अपिलार्थी
विरुध्द
निबंधक. जन्म - मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्राम अधिकारी/ मुख्याधिकारी जुन्नर नगरपरिषद - प्रतिवादी

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमुद किरकोळ फौजदारी अर्ज, अर्जदार युसुफ महमंद शेख रा जुन्नर ता जुन्नर जि पुणे यांचा/यांची स्वताः नामे युसुफ महमंद शेख यांचा/हिचा जन्म 14.3.1976 रोजी मोजे जुन्नर, ता. जुन्नर जि.पुणे येथे झालेला आहे. यांचा जन्म नोंदीचा हुकुम मिळविण्याकरीता अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, कलम १३ (३) प्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज नं.482/25 दिनांक 30.10.2025 रोजी दाखल केलेला आहे. सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन 15 दिवसांचे आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने कागदपत्रांसोबत मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणती. ही हरकत न आल्यास सदर अर्जास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकुम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. 11/6/2026 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी ही जाहीर नोटीस दिली असे.

सही/-
(सचिन मुंढे)
नायब तहसिलदार
उपविभागीय अधिकारी
जुन्नर -आंबेगाव उपविभाग मंचर

## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग
निविदा जाहिरात - नविन कामे
अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दिनांक : १३/०६/२०२६ ०९.०० सकाळी ते २०/०६/२०२६ १४.३० दुपारी पर्यंत
स्वीकृती दिनांक : १३/०६/२०२६ ०९.०० सकाळी ते २०/०६/२०२६ १४.३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २२/०६/२०२६ १५:०० दुपारी

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_103 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २६ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणे करिता मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ५०८४४४२/- | रू. ५०८४४/- | १२ | ९९७०१३८२३१ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_104 | पाणी पुरवठा | स्वारगेट पाणीपुरवठा विभाग कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २३ मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती कामे करणेसाठी मजूर पुरविणे व इतर दैनंदिन देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ८४७३६११/- | रू. ८४७३६/- | १२ | किरण देसले ९६८९९३८३०४ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_105 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २४ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणेसाठी मजूर पुरविणे व इतर दैनंदिन देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ५२५३७७५/- | रू. ५२५३८/- | १२ | सागर तानाजीराव सिंगारे ७७७५०५४५५६ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_106 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभागांमध्ये दैनदिन व्हॉल्व सोडबंद करणेसाठी पाणीवाला मजूर पुरविणे. | रू. ६०७९/- | रू. ८१९९७१८/- | रू. ८१९९७/- | १२ | सागर तानाजीराव सिंगारे ७७७५०५४५५६ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_107 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २५ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणेसाठी मजूर पुरविणे व इतर दैनंदिन देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ६४२३१८३/- | रू. ६४२३२/- | १२ | विक्रम क्षीरसागर ९६८९९३११८० |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_108 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २२ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणे करिता मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ५०८४४९३/- | रू. ५०८४५/- | १२ | ९९७०१३८२३१ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_109 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १३ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणे करिता मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रू. १३५९/- | रू. २४९९४४७/- | रू. २४९९४/- | १२ | सल्लौदिन शेईख ९८६००२१३०८ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_110 | पाणी पुरवठा | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १३ मध्ये दैनंदिन व्हॉल्व सोडबंद कामे करणे करिता पानीवाला मजूर पुरविणे. | रू. १३५९/- | रू. १९९९५२१/- | रू. १९९९५/- | १२ | सल्लौदिन शेईख ९८६००२१३०८ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_111 | पाणी पुरवठा | स्वारगेट पाणीपुरवठा विभाग कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २३ मध्ये दैनदिन व्हॉल्व सोडबंद कामे करणे साठी पाणीवाला मजूर पुरविणे. | रू. ४१५/- | रू. ९९९२०१/- | रू. ९९९२/- | १२ | किरण देसले ९६८९९३८३०४ |
| 2026_MAIN_ WATER_ SUPPLY_112 | पाणी पुरवठा | स्वारगेट पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभागांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करणे. | रू. ४१५/- | रू. ९९९७७५/- | रू. ९९९८/- | १२ | किरण देसले ९६८९९३८३०४ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
Sanket Sudhakar Mane
टेंडर लिपिक (पाणीपुरवठा)
पुणे महानगरपालिका

सही/-
Sunil Yadav
कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/२०८ दि. १२/०६/२०२६

# राष्ट्रीय पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे गुरूजी यांचा महापौरांच्या हस्ते सन्मान

पिंपरी (दै. संध्या)



राष्ट्रीय पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी यांनी शासकीय शिक्षण व्यवस्थेमध्ये केलेले कार्य प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढवून त्यांनी सरकारी शाळांचा कायापालट घडवून आणला. वाबळेवाडी आणि जळिंदरनगर येथील शाळांमध्ये त्यांनी केलेल्या अभिनव प्रयोगांमुळे केवळ विद्यार्थी संख्येत मोठी वाढ झाली नाही, तर त्या शाळांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी पालकांच्या रांगा लागण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ही बाब त्यांच्या कार्याची परिणामकारकता अधोरेखित करणारी आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मोरवाडी येथील दिव्यांग भवन फाऊंडेशन येथे सी. एस. आर. कक्षाअंतर्गत शहरातील विविध उद्योगसमुहांसवेत संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रीय पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सह आयुक्त मनोज लोणकर, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध उद्योग समूहांचे सीएसआर प्रतिनिधी उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, दत्तात्रय वारे गुरुजी यांनी विकसित केलेली शैक्षणिक पद्धती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी असून गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रभावी मार्ग त्यांनी दाखवून दिला आहे. शिक्षण क्षेत्रात त्यांनी घडवून आणलेली सकारात्मक क्रांती ही केवळ काही शाळांपुरती मर्यादित नसून ती राज्य आणि देशपातळीवर विस्तारत आहे. त्यांच्या कार्यामुळे शासकीय शाळांकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन बदलला असून सरकारी शाळाही जागतिक दर्जाचे शिक्षण देऊ शकतात, हा विश्वास समाजामध्ये निर्माण झाला आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मान प्राप्त करूनही त्यांनी विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाची वाट कायम ठेवली आहे. आजच्या पिढीला सक्षम, सुसंस्कृत आणि स्पर्धात्मक बनविण्यासाठी त्यांनी सुरू केलेली शैक्षणिक चळवळ देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन प्रत्येक शासकीय शाळेत शिक्षणाची नवी उंची गाठण्याचा प्रयत्न व्हावा, अशी अपेक्षा आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे महापौर रवि लांडगे यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे यावेळी मनोगत व्यक्त करताना म्हणाले, गेली तीन दशके मी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून या प्रवासात शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. आजही देशातील शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची आवश्यकता असून विशेषतः शासकीय शाळांच्या गुणवत्तावृद्धीसाठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. शासकीय शाळा दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण झाल्या तर पालकांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन निश्चितपणे बदलेल. विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे आणि सरकारी शाळांचा दर्जा उंचावणे हेच माझे ध्येय राहिले आहे. यासाठी माझ्याकडे असलेले ज्ञान, अनुभव आणि शैक्षणिक नवकल्पना समाजाच्या हितासाठी वापरण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत आहे. शिक्षण क्षेत्रातील हे कार्य कोणत्याही एका व्यक्तीचे नसून सामूहिक प्रयत्नांमधून घडणारी चळवळ आहे. या उपक्रमामध्ये राज्यभरातील अनेक शिक्षक उत्साहाने सहभागी झाले असून विद्यार्थीकेंद्रित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ते कार्यरत आहेत. शासकीय शिक्षण व्यवस्थेमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचविण्यासाठी आयुष्याचा पूर्ण वेळ या कार्यासाठी समर्पित करण्याची माझी तयारी आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीसाठी सुरू केलेली ही मोहीम भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात पुढे नेण्याचा आमचा मानस आहे.

दत्तात्रय वारे यांनी जिल्हा परिषद शाळा, वाबळेवाडी (ता. शिरूर, जि. पुणे) येथे कार्यरत असताना अवघ्या तीन वर्षांत शाळेतील विद्यार्थी संख्या ३२ वरून ७२१ पर्यंत वाढविली. त्यांच्या प्रयत्नांमुळे या शासकीय शाळेत प्रवेशासाठी तब्बल ५ हजार विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी निर्माण झाली. वाबळेवाडी शाळेला भारतातील पहिली 'शून्य ऊर्जा' (झिरो एनर्जी) शाळा म्हणून ओळख मिळाली असून महाराष्ट्र शासनाने २०१६ मध्ये या शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळेचा मान प्रदान केला. विशेष म्हणजे कोणत्याही खासगी शिकवणीशिवाय विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा व प्रवेश परीक्षांमध्ये शंभर टक्के यश मिळविले. त्यांच्या अध्यापन पद्धतीवर आधारित शासकीय शिक्षण मॉडेल विकसित करण्यात आले असून या मॉडेलच्या आधारे महाराष्ट्रातील सुमारे साडेचार लाख शिक्षकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यानंतर जिल्हा परिषद शाळा, जळिंदरनगर (ता. खेड, जि. पुणे) येथेही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

अवघ्या दोन वर्षांत या शाळेतील विद्यार्थी संख्या ३ वरून १५० पर्यंत वाढली असून प्रवेशासाठी सुमारे ५०० विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार झाली आहे. दुर्गम भागातील ही शाळा जगातील सर्वोत्तम शाळांच्या स्पर्धेत 'टॉप १०' मध्ये स्थान मिळविण्यात यशस्वी ठरली. शासकीय शाळा असूनही जागतिक स्तरावर सर्वोत्तम शाळांपैकी एक म्हणून या शाळेचा गौरव झाला आहे.

वारे यांनी भारतीय परिस्थितीला सुसंगत आणि जागतिक शिक्षण व्यवस्थेला समकक्ष अशी पर्यायी शिक्षण प्रणाली विकसित केली. या शैक्षणिक मॉडेलच्या विकासासाठी भारतीय व्यवस्थापन संस्था, अहमदाबाद (आयआयएम अहमदाबाद) हे ज्ञानसहभागी म्हणून कार्यरत असून या पद्धतीच्या माध्यमातून राज्यातील तसेच देशभरातील हजारो शाळांच्या विकासाची प्रक्रिया सुरू आहे. या शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना २०१६ मध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. याशिवाय सृष्टी सन्मान पुरस्कार, अहमदाबाद, वर्ल्डस बेस्ट स्कूल अवॉर्ड्स २०२५ तसेच कम्युनिटी चॉईस अवॉर्ड – बेस्ट ऑफ द बेस्ट स्कूल यांसारख्या प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शहरातील टपालपेटी धूळ खात; पत्रांची वाट पाहणाऱ्या टपाल पेट्यांवर चढला गंज

खराळवाडी (दैनिक संध्या) : सध्या फोनवर बोलून नागरिक एकमेकांशी संवाद साधताना सर्रासपणे दिसतात. या आधुनिकीकरणामुळे टपाल पत्राची वाट बघत बसायची वेळ आता संपली आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे पत्राची वाट पाहत बसण्यापेक्षा नागरिक आता भ्रमणध्वनीवर आपली खुशाली थेट कळवतात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे पूर्वीच्या पत्राची जागा आता ई-मेल, व्हॉट्सअप, इंस्टाग्राम, फेसबुक मेसेजने घेतली आहे. त्यामुळे लाल रंगाची पत्रपेटी आता दुर्मीळ झाली आहे. ज्या पेट्या आहेत त्या धूळ खात पडलेल्या आहेत. पूर्वीच्या काळी गावात पत्र वाचणारे आणि लिहिणाऱ्यांची मोजकीच संख्या असायची. त्यांच्याकडे जाऊन आपले निरोप, खुशाली सांगून पत्राद्वारे पाठवत असत. आज काळ बदलला आहे. प्रगती होत असताना परस्पर संवादाची साधने बदलली आहेत. शिक्षण आणि तंत्रज्ञानाने क्रांती होऊन सर्वांचे जीवन बदलले आहे. प्रत्येक गावात पत्रपेटीसाठी लाल डबा लटकलेला असायचा. आता मात्र, तो कुठेही दिसेनासा झाला आहे. पोस्टमन यातील सारी पत्र एकत्र करुन पुढे पाठवत असे. आज मात्र ऑनलाइनच्या जमान्यात नवीन संशोधनात हा पत्रव्यवहार काहीसा दुरावला आहे. पूर्वीच्या काळात तंत्रज्ञानाची फारशी प्रगती झालेली नव्हती. काही वर्षांपूर्वी पत्र आले का ? अशी विचारणादेखील पोस्टमनकडे केली जायची. पूर्वी पत्राला खूप महत्त्व होते. त्यामुळे नोकरभरती किंवा सुखदुःखाचे सर्व निरोप हे पत्राद्वारेच मिळायचे.

### 70 हजारांची लाच घेताना महापालिकेचा बीट निरीक्षक एसीबीच्या जाळ्यात

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे गुरव परिसरात अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी ७० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ड क्षेत्रीय कार्यालयातील बीट निरीक्षक उमेश लोंढे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महापालिका वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका नागरिकाने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. संबंधित तक्रारदाराच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी उमेश लोंढे याने ७० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने पिंपळे गुरव परिसरात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे लाचेची रक्कम स्वीकारताना उमेश लोंढे याला एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात ताब्यात घेतले. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, महापालिकेच्या विविध विभागांतील कामकाजावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एसीबीकडून पुढील तपास सुरू असून, या प्रकरणात आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सार्वजनिक कामांसाठी अथवा प्रशासकीय प्रक्रियेसाठी कोणताही शासकीय कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शाळांभोवतीच्या गुटखा विक्रेत्यांवर कारवाई

पिंपळे गुरव(दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आणणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीविरोधात सांगवी पोलिसांनी आता कंबर कसली आहे. शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात सुरू असलेल्या पान, गुटखा, सिगारेट व इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली असून, पिंपळे गुरव परिसरातील विविध शाळांच्या १०० मीटर परिघातील पानटपऱ्या व दुकानांना कायदेशीर नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात कठोर भूमिका घेत सांगवी पोलिसांनी संबंधित दुकानदारांना नियमांचे पालन करण्याचा स्पष्ट इशारा दिला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, अनेकांनी तत्काळ अशा पदार्थांची विक्री बंद करण्यास सुरुवात केल्याची माहिती मिळत आहे. सांगवी पोलिसांनी कारवाईसाठी टप्प्याटप्प्याने कार्यपद्धती निश्चित केली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या नोटीसद्वारे दुकानदारांना शाळा परिसरात गुटखा, पानमसाला, सिगारेट व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री न करण्याची सक्त ताकीद दिली आहे. मात्र, वारंवार सूचना देऊनही नियमांचे उल्लंघन सुरू राहिल्यास संबंधित दुकान चालकाविरोधात COTPA कायद्यानुसार खटला दाखल करून न्यायालयीन कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य पदार्थ अधिनियम (COTPA) २००३ नुसार कोणत्याही शाळा, महाविद्यालय किंवा शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास बंदी आहे.

## वरिष्ठ अधिकाऱ्यांवर नियंत्रण कक्षाची करडी नजर

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या वास्तव्याबाबत चुकीची माहिती देणे, कार्यक्षेत्राबाहेर जाऊनही त्याची माहिती न देणे अथवा वरिष्ठांना दिशाभूल करणे आता महागात पडणार आहे. पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण आदेश जारी केला असून, आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हालचालींवर नियंत्रण कक्षातून थेट लक्ष ठेवले जाणार आहे. दररोज सकाळी साडेनऊ आणि सायंकाळी साडेआठ वाजता अधिकाऱ्यांच्या उपस्थितीची पडताळणी केली जाणार असून, खोटी अथवा अपूर्ण माहिती देणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. कायदा व सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, तपास आणि प्रशासकीय कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच, आपत्कालीन परिस्थितीत वरिष्ठ अधिकारी तातडीने उपलब्ध राहावेत, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. आदेशानुसार सर्व पोलिस उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांची अद्ययावत माहिती नियंत्रण कक्षाकडे नियमितपणे उपलब्ध राहणार आहे. त्यासाठी दिवसातून दोन वेळा खातरजमा करून त्याची नोंद स्वतंत्रपणे जतन केली जाणार आहे. एखादा अधिकारी संपर्काबाहेर असल्यास, उपलब्ध नसल्यास किंवा दिलेल्या माहितीत विसंगती आढळल्यास त्याची माहिती तातडीने पोलिस आयुक्त आणि संबंधित वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली जाणार आहे.

## पिंपरी कॅम्प मधील रस्ता आता १५ मीटर होणार – अण्णा बनसोडे

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी कॅम्प मधील साई चौक ते शास्त्री उद्यान हा रस्ता रुंदीकरण करण्याचे काम महानगरपालिकेने हाती घेतले आहे.

या परिसरात रस्ते मोजणी करण्यात येणार आहे. हा रस्ता १८ मीटर ऐवजी १५ मीटर रुंद करावा या व्यापाऱ्यांच्या मागणीला आयुक्तांनी सहमती दर्शवली आहे अशी माहिती विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिली.



विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत ऑटो क्लस्टर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. नगरसेवक डब्बू आसवानी, पिंपरी चिंचवड मर्चंट फेडरेशनचे अध्यक्ष श्रीचंद आसवानी, नगरसेवक सविता आसवानी, जेष्ठ नेते धनराज आसवानी, जीतू मगतानी, जॉनी थडानी, सुरेश धनवानी, अमर बजाज, पेहलाज वाधवानी, मनोहर जेठवाणी, गोपी धनवाणी, दिनेश मुलचंदानी, आशा धनवाणी, गणेश चटले यांच्या समवेत २०० व्यापारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

हा रस्ता १८ मीटर रुंदीकरण केल्यानंतर येथील व्यापाऱ्यांना व्यवसाय व राहण्यासाठी जागा शिल्लक राहणार नाही. मागील बाजूला रेल्वे लाईन असल्यामुळे अरुंद पट्टा शिल्लक राहील. यासाठी मागील अनेक दिवसांपासून हे रुंदीकरण १५ मीटर करण्यात यावे, यासाठी पिंपरी चिंचवड मर्चंट फेडरेशनच्या माध्यमातून श्रीचंद आसवानी, डब्बू आसवानी यांनी पाठपुरावा केला होता.

या बैठकीत आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी आश्वासन दिले की, व्यापाऱ्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून स्थानिक लोकप्रतिनिधी व पिंपरी चिंचवड मर्चंट फेडरेशनच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत या ठिकाणी १५ मीटर रस्ता रुंदीकरणासाठी मोजणी करण्यात येईल.

श्रीचंद आसवानी सांगितले की, पिंपरी कॅम्प मधील साई चौक ते शास्त्री उद्यान हा रस्ता १५ मीटर रुंदीकरणासाठी लोकप्रतिनिधी व व्यापाऱ्यांनी होकार दिला आहे. सर्व व्यापाऱ्यांच्या एकजुटीमुळे ही मागणी प्रशासनाने मान्य केली. व्यापाऱ्यांनी अशीच एकी दाखवून पिंपरी कॅम्पातील इतर समस्या सोडवण्यासाठी पाठबळ द्यावे असे श्रीचंद आसवानी यांनी सांगितले.

## माऊलींच्या रथाच्या सारथी बैलजोडीच्या मानावरून वाद

पिंपरी (दै. संध्या)

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आळंदीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील रथासाठी निवडल्या जाणाऱ्या सारथी बैलजोडीच्या मानावरून वाद निर्माण झाला आहे. बैलजोड समितीने तुळशीराम रानवडे आणि हर्षवर्धन रानवडे यांच्या नावाची शिफारस केल्यानंतर उमेश रानवडे यांनी आपल्यावर अन्याय झाल्याचा आरोप करत बैलजोडीसह सहकुटुंब बेमुदत आंदोलन सुरू केले आहे.



उमेश रानवडे यांचे बैलजोडीसह बेमुदत आंदोलन

उमेश रानवडे यांचा दावा आहे की, यंदा माऊलींच्या रथासाठी सारथी बैलजोडीचा मान त्यांच्या वाट्याला येणे अपेक्षित होते. मात्र, समितीने दुसऱ्यांची शिफारस करून त्यांना डावलल्याने त्यांनी हा निर्णय घेतला असल्याचे सांगितले. आंदोलनासाठी त्यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरासमोर ठिय्या मांडला असून, त्यांच्या कुटुंबीयांसह बैलजोडी देखील आंदोलनस्थळी उपस्थित आहे.

या प्रकरणामुळे वारकरी संप्रदायात आणि आळंदी परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

आषाढी वारीसारख्या महत्त्वाच्या धार्मिक सोहळ्याच्या तोंडावर निर्माण झालेला हा वाद सोडवण्यासाठी संबंधित समिती आणि प्रशासनाने मध्यस्थी करावी, अशी मागणी काही वारकऱ्यांकडून होत आहे.

दरम्यान, उमेश रानवडे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत, "मला मान किंवा प्रतिष्ठा नको आहे. माऊलींच्या पालखी सोहळ्यात सेवा करण्याची संधी मिळावी, एवढीच माझी अपेक्षा आहे," असे सांगितले. या आंदोलनामुळे सारथी बैलजोडी निवडीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, यावर समितीची भूमिका काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पिंपरी-चिंचवड मनपा रुग्णालयात कॅशलेस सुविधेचा अभाव

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेची सर्वच रुग्णालये कॅशलेस सुविधेअभावी मागे पडली आहेत. रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागात रोख पैसे भरुनच केसपेपर, बिलाची रक्कम जमा करावी लागते. कॅशलेस सुविधा नसल्याने रुग्ण नातेवाईकांची धावपळ होत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेत 1 एप्रिल 2025 पासून पेपरलेस कामकाज सुरू झाले आहे. यापुढे प्रशासनात फाईल किंवा प्रस्ताव कागदोपत्री न स्वीकारण्याची भूमिका तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांनी घेतली होती.

मात्र, महापालिकेची रुग्णालये, दवाखान्यांमध्ये डिजिटल व्यवहार सुरू करणे प्रशासनाला शक्य झालेले नाही, वर्षाभरात फक्त वायसीएम आणि थेरगाव रुग्णालयातच कॅशलेस सुविधा उपलब्ध झाली आहे. इतर ठिकाणी रुग्ण व त्याच्यासोबत आलेल्या नातेवाईकांची गैरसोय होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांत येणाऱ्या रुग्णांना केसपेपर काढण्यासाठी तसेच बिलिंग काउंटरवर कॅशलेस सुविधा नसल्यामुळे रोख स्वरुपात शुल्क भरावे लागते. अनेकदा नागरिकांकडे सुटे पैसे नसल्यास कर्मचारी त्यांच्या सोयीसाठी पेपर देतात.

## दुबई-बँकॉकमधून सायबर रॅकेट चालवणारा आंतरराष्ट्रीय गुन्हेगार जेरबंद

### रेड कॉर्नर नोटीसच्या आधारे थायलंडमधून भारतात आणले

पिंपरी (दै. संध्या)

दुबई आणि थायलंडमधून भारतातील नागरिकांची कोट्यवधी रुपयांची सायबर फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारी टोळीच्या मुख्य सूत्रधाराला पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी अखेर जेरबंद केले. इंटरपोलच्या रेड कॉर्नर नोटीस आणि लुक आऊट सर्क्युलरच्या (एलओसी) आधारे थायलंडमधील बँकॉक विमानतळावर त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांच्या या कामगिरीचे राज्य स्तरावर कौतुक केले जात आहे.

सौरभ उर्फ गणेश बाळासो काळे, असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीचा देहूरोड आणि हिंजवडी



पोलिस ठाणे येथे दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये सहभाग निष्पन्न झाला. या गुन्ह्यांमध्ये टास्क फ्रॉड, शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक आणि कोट्यवधी रुपयांच्या ऑनलाइन आर्थिक गुन्ह्यांचा समावेश आहे.

देहूरोड पोलिस ठाण्यातील गुन्ह्याचा तपास सुरू असताना सायबर पोलिसांनी जून २०२४ मध्ये १३ आरोपींना अटक केली होती. त्यांची चौकशी केल्यानंतर या संपूर्ण रॅकेटचा सूत्रधार सौरभ उर्फ गणेश काळे असल्याचे समोर आले. आरोपी दीपक गाडे हा दुबई येथे जाऊन गणेश काळेला भेटला होता. भारतातील विविध बँक खात्यांची माहिती, एटीएम कार्ड, चेकबुक, इंटरनेट बँकिंग आयडी आणि पासवर्ड आरोपीला पुरवले जात असल्याचे उघड झाले. त्याबदल्यात संबंधितांना मोबदला दिला जात होता.तपासात आरोपीने दुबईमध्ये सायबर फसवणुकीचे मुख्य कार्यालय उभारल्याचेही निष्पन्न झाले.

सायबर पोलिसांचे सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण स्वामी यांनी केलेल्या तांत्रिक तपासात आरोपी भारतातील विविध व्यक्तींकडून बँक खाती मिळवून त्यांचा वापर सायबर गुन्ह्यांमधून आलेला पैसा स्वीकारण्यासाठी आणि वळवण्यासाठी करत असल्याचे आढळून आले. तसेच आरोपी चीनसह इतर परदेशी नागरिकांच्या संपर्कात होता. त्यांच्या मदतीने टास्क फ्रॉड, शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक, डिजिटल अरेस्टसारख्या क्लृप्त्या वापरून भारतीय नागरिकांना गंडा घातला जात होता.

दरम्यान, आरोपीविरुद्ध उपलब्ध पुराव्यांच्या आधारे महाराष्ट्र शासनामार्फत केंद्रीय गृह मंत्रालयाकडे प्रत्यार्पणाचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यावर दुबईतील भारतीय दूतावासामार्फत कायदेशीर प्रक्रिया सुरू होती. मात्र, सप्टेंबर २०२५ मध्ये आरोपी दुबई सोडून बँकॉक येथे पळून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानंतर पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी महाराष्ट्र शासन आणि केंद्रीय गृह मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा करून आरोपीविरुद्ध रेड कॉर्नर नोटीस आणि लुक आऊट सर्क्युलर जारी करून घेतले. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या समन्वयातून आरोपी थायलंडमधून अन्य देशात पळून जाण्याच्या तयारीत असताना बँकॉक विमानतळावर स्थानिक सुरक्षा यंत्रणांनी त्याला ताब्यात घेतले.

आरोपीला भारतात आणल्यानंतर ११ जून रोजी मुंबई विमानतळावर सायबर पोलिसांचे सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण स्वामी, पोलिस हवालदार हेमंत खरात आणि पोलिस शिपाई नितेश बिचेवार यांच्या पथकाने त्याचा ताबा घेतला. त्यानंतर देहूरोड पोलिस ठाण्याच्या गुन्ह्यात त्याला अटक करण्यात आली.

तपासादरम्यान आरोपीचा मुंबईतील नोडल सायबर पोलिस ठाणे, मालवणी पोलिस ठाणे तसेच तेलंगणातील सायबराबाद पोलिस ठाण्यातील अनेक सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांशी संबंध असल्याचेही उघड झाले आहे. त्यामुळे देशभरातील अनेक आर्थिक सायबर गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तपास सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक रविकिरण नाळे करीत आहेत.

## अल निनोचा धोका ओळखा; पुरेसा पाऊस पडल्यावरच करा पेरणी

**मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांचे आवाहन**



यवत (दै. संध्या)

शेतीचा शाश्वत विकास आणि जमिनीचे आरोग्य जपण्याच्या उद्देशाने खामगाव (ता- दौंड) येथे विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मोहिमांचे आयोजन करण्यात येत आहे, त्या अनुषंगाने आयोजित

कार्यक्रमात हवामान बदलावर मार्गदर्शन करताना मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप यांनी शेतकऱ्यांना अत्यंत महत्त्वाचा सल्ला दिला. ते म्हणाले, "सध्या 'अल निनो'चा प्रभाव जाणवत आहे. यामुळे पावसाच्या वितरणात अनिश्चितता राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ ढगाळ वातावरण पाहून घाईने पेरणी करू नका. जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होईल इतका समाधानकारक पाऊस पडल्यानंतरच शेतकऱ्यांनी पेरणीचे धाडस करावे, जेणेकरून दुबार पेरणीचे संकट टाळता येईल." यावेळी सतीश जगताप यांनी जमिनीचा पोत सुधारण्यासाठी रासायनिक खतांचा अतिवापर थांबवून सेंद्रिय कर्ब वाढवण्यावर भर दिला.

या कार्यक्रमात उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी जैविक खतांचा संतुलित वापर करण्याविषयी मार्गदर्शन केले. सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी 'महाविस्तार AI App' आणि 'महाडिबीटी पोर्टल'वरील शासकीय योजनांची सविस्तर माहिती देऊन शेतकऱ्यांना डिजिटल साधनांचा लाभ घेण्यास प्रोत्साहित केले. कार्यक्रमात हुमणी अळीचे नियंत्रण आणि प्रकाश सापळ्यांचा वापर या तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शेती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्थानिक प्रयोगशील शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये शांताराम दादा नागवडे, बापूसाहेब थोरात, अजित नागवडे, तुषार शेळके, आबासाहेब शंकर नागवडे, विनोद जगताप, बबन तांबे, आतेश खेडेकर आणि स्वप्निल नागवडे यांचा समावेश होता. याप्रसंगी बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते, तर आभार प्रदर्शन सहाय्यक कृषी अधिकारी पंढरीनाथ कुतवळ यांनी केले.

## गुणवत्तापूर्ण रस्ते निर्माण करावेत : सुनेत्रा अजित पवार

पुणे (दै. संध्या)



शेत रस्ते हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांचा विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये समावेश करण्यात यावा, असे निर्देश राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. जिल्ह्यात अधिकाधिक रस्ते निर्माण करण्यात यावेत, याकरिता निधीची कमतरता पडू देणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची बैठक विधानभवन येथील झुंबर सभागृह येथे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, यावेळी आमदार शंकर मांडेकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपजिल्हाधिकारी डॉ. चारुशिला देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जिल्हास्तरीय कार्यकारी समितीचे सदस्य आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविणारी योजना आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दर्जेदार रस्ते मिळणार आहेत. रस्त्याची कामे पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या समस्या सुटण्यासह त्यांच्यामध्ये समाधानाची भावना निर्माण होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण व दर्जेदार रस्ते निर्माण करण्याकरिता सर्वांनी मिळून प्रयत्न करुया, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले.

योजनेच्या प्रगतीचा आढावा दरमहा बैठक आयोजित घेण्यात येईल, जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीस जिल्ह्यातील आमदारांना निमंत्रित करावे, असेही श्रीमती पवार म्हणाल्या.

यावेळी श्री. जगदाळे यांनी या योजनेअंतर्गत विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीमध्ये जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांचा समावेश करण्याबाबत सूचना केली. जिल्ह्यात रस्ते निर्मितीच्या कार्यात सहकार्य करण्यात येईल, असेही श्री. जगदाळे म्हणाले.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाबाबत संगणकीय सादरीकरण केले. जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने निश्चित केलेले कंत्राटदारांची सूची (पॅनल), कमी दराची निविदा (एल १) दर, मोजणी करुन निश्चित केलेले ५०५ रस्ते आदीबाबत माहिती दिली तसेच मोजणी झालेल्या रस्त्यांचे आठवड्याभरात काम सुरु करणार असल्याचे श्री. डुडी यांनी सांगितले.

## संपत्ती कमवा पण संततीकडे दुर्लक्ष करू नका : ह.भ.प. रामदास महाराज तांबे

चाकण (दै. संध्या)

संपत्ती कमवा पण संततीकडे मुळीच दुर्लक्ष करू नका, त्याकरिता आई - वडिलांची सेवा करा असा सल्ला समाज प्रबोधनकार ह.भ.प. रामदास महाराज तांबे यांनी येथे दिला. चाकण येथे श्री चक्रेश्वर मंदिर देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम पुरुषोत्तम अधिक मास कीर्तन सोहळ्यात मार्गदर्शन करताना तांबे महाराज बोलत होते. चक्रेश्वर मंदिरात नित्याचा काकडा आरती, विष्णु सहस्रनाम, श्री ज्ञानेश्वरी पारायण, भजन, हरिपाठ व हरिजागराचा कार्यक्रमही उत्साहात सुरू आहे.

याप्रसंगी नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, गटनेते नितीन गोरे, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख विनोद महाळुंगकर पाटील, उद्योजक बप्पासाहेब जोगदंड, मुक्ताजी नाणेकर, अमृत शेवकरी, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे, नगरसेविका रूपाली कांडगे, उद्योजक राहुल कांडगे, राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते. अध्यात्मा शिवाय पर्याय नाही असे सांगून तांबे महाराज पुढे म्हणाले," संत हेच समाज घडवतात. त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. संतांचा आदर्श घ्या. संस्कृतीला तडा जाऊ न देता माणुसकी आणि नाती जपायला शिका.

## जर्मनीत नोकरीसाठी जाणाऱ्या युवकाला शरद पवार यांचे मार्गदर्शन

बारामती (दै. संध्या)



**वरे-परकाळे परिवाराची गोविंद बाग येथे सदिच्छा भेट**

बारामती येथील गोविंद बाग येथे आज राष्ट्रनेते शरदचंद्र पवार यांची मळद व पवारवाडी येथील वरे व परकाळे परिवारातील सदस्यांनी सदिच्छा भेट घेतली.

या भेटीदरम्यान चि. अभिषेक राजेश परकाळे याला पुण्यातील आयटी क्षेत्रात काम करत असताना जर्मनी येथे नोकरीची संधी मिळाल्याबद्दल विशेष चर्चा करण्यात आली. लवकरच तो जर्मनीला रवाना होणार असल्याने पवार साहेबांनी त्याच्याकडून नोकरीविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच विदेशात कार्यरत असताना पाळावयाची शिस्त, कामातील प्रामाणिकपणा, नवीन संस्कृतीशी जुळवून घेणे आणि करिअरमध्ये प्रगती साधण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले.

यावेळी शेतीविषयकही महत्त्वपूर्ण चर्चा झाली. पिकांचे नियोजन, पाणी व्यवस्थापन तसेच उत्पादनाच्या प्रभावी मार्केटिंगबाबत पवार साहेबांनी मार्गदर्शन केले.

अभिषेक परकाळे याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत उज्वल भवितव्याची कामना व्यक्त केली.

त्यानंतर अभिषेकचा सत्कार वरे कुटुंबीयांच्या निवासस्थानी करण्यात आला. शाल व श्रीफळ देऊन बंधू श्री बाळासो वरे व श्री हनुमंत वरे यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी कृषिभूषण प्रल्हाद वरे, श्री राजेश परकाळे, श्री गौरव जाधव, श्री मोहन परकाळे, श्री संजय परकाळे, श्री जगदीश परकाळे, श्री संताराम परकाळे, श्री हनुमंत वरे, श्री संजय वरे, श्री राजेंद्र वरे, श्री तुकाराम गावडे, श्री राहुल परकाळे, श्री महेश परकाळे, अजिंक्य वरे, प्रथमेश वरे, सिद्धार्थ तावरे, आर्यन वरे तसेच वरे-परकाळे परिवारातील इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### बारामती तालुक्यात "हरित शाळा" हरित गाव "वृक्ष लागवड उपक्रमाचे आयोजन

■ श्री. किरण तावरे यांच्या संकल्पनेतून व शिवाकाका फाउंडेशनच्या सहकार्यातून विशेष उपक्रम

बारामती (दैनिक संध्या) : २२ जुलै रोजी महाराष्ट्राचे लाडके नेते,स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्त दादांचे हरितग्राम चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी बारामती तालुक्यात एक कौतुकास्पद आणि पर्यावरणपूरक पाऊल उचलले जात आहे.पंचायत समितीचे सभापती श्री,किरण तावरे यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून आणि शिवाकाका कारंडे फाउंडेशनच्या विशेष सहकार्यातून संपूर्ण बारामती तालुक्यात ' हरित शाळा हरित गाव ' हा भव्य वृक्षलागवड उपक्रम राबविला जाणार आहे. गायराण जागेत आणि जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांच्या आवारात मोठ्या प्रमाणावर झाडे लावून निसर्गाचा समतोल राखण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न आहे. या उपक्रमाला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत बारामती पंचायत समितीच्या वतीने पहिल्याच टप्प्यात तालुक्यातील तब्बल ५० एकर गायरान जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे.या पर्यावरण क्रांतीला गती दिल्याबद्दल आणि दूरगामी निर्णय घेतल्याबद्दल मा.किरण तावरे सभापती साहेबांचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले.तरी चला,आपण सर्वजण मिळून या ' हरित शाळा हरित ग्राम उपक्रमात सहभागी होऊया, अजितदादांच्या स्वप्नातील बारामती अधिक हिरवेगार बनवूया!!

### पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्याचे कृषी अधिकाऱ्याचे आवाहन

बारामती (दैनिक संध्या) : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी स्वतःकडे उपलब्ध असलेल्या मका, कांदा, सोयाबीन, तूर, मूग आदी पिकांच्या बियाण्यांची उगवण क्षमता तपासून घेवूनच पेरणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. घरच्या घरी साध्या पद्धतीने १०० बियाणे ओल्या कापडात किंवा कागदात ठेवून सावलीत ठेवावीत. आवश्यकतेनुसार ओलावा कायम राखावा. पिकानुसार ५ ते १० दिवसांनंतर उगवलेल्या बियाण्यांची संख्या मोजून उगवण टक्केवारी निश्चित करता येते. उदाहरणार्थ, १०० पैकी ७५ बियाणे उगवली असल्यास उगवण क्षमता ७५ टक्के समजावी. उगवण क्षमता शिफारशीनुसार असल्यासच ती बियाणे पेरणीसाठी वापरावीत. उगवण क्षमता कमी असल्यास बियाण्यांचे प्रमाण वाढविणे किंवा प्रमाणित बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करणे आवश्यक आहे. खरेदी केलेल्या बियाण्यांचे पक्के बिल जतन करून ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. पेरणीपूर्वी उगवण क्षमता तपासून दर्जेदार बियाण्यांचा वापर केल्यास अपेक्षित रोपसंख्या मिळून उत्पादनवाढीस मदत होणार असल्याचे श्री. हाके यांनी कळविले आहे.

### शिकवणीहून घरी परतणाऱ्या मुलीचा मोटारीच्या धडकेत मृत्यू

वाडेबोल्हाई (दैनिक संध्या) : शिकवणी संपवून मैत्रिणीसमवेत दुचाकीवरून घरी निघालेल्या एका १४ वर्षीय शाळकरी मुलीला भरधाव मोटारीने धडक दिल्याने मृत्यू झाला. हा अपघात अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील माऊली बाल आश्रमाजवळ झाला. अनन्या दादाभाऊ गावडे (वय-१४, रा. वाडेबोल्हाई, खुटाळे वस्ती, ता. हवेली) असे अपघातात मृत्युमुखी पडलेल्या मुलीचे नाव आहे. याप्रकरणी तिचे वडील अनिल दादाभाऊ गावडे (वय ४०) यांनी लोणीकंद पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात मोटारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## भिवंडीत शिवसेनेची प्रांत कार्यालयावर धडक!

भिवंडी (दै. संध्या)



**तुकाराम मुंढेंची बदली प्रकरण! प्रचंड वाढता जन पाठिंबा**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या भिवंडी शहर जिल्हा शाखेच्या वतीने शहरप्रमुख गजेंद्र गुळवी, प्रदिप बोडके आणि जिल्हा संघटिका सौ.दिपाली जैन यांच्या नेतृत्वाखाली तसेच सुभाष (नाना) झळके शहर समन्वयक यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आज मंगळवार दि.९ जून २०२६ रोजी भिवंडीतील प्रांत कार्यालयावर धडक दिली. निमित्त होते नुकतेच अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदावर नियुक्त झालेले कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली न करणे बाबत.

कर्तव्यदक्ष अधिकारी तुकाराम मुंढे यांनी शासनाच्या ज्या विभागाचा कारभार हाती घेतला त्या विभागातील भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट करण्याचा विडाच उचलला आहे. म्हणून भ्रष्टाचाऱ्यांनी फिल्डिंग लावून त्यांची बदली करण्याचे सत्र अवलंबविले आहे. म्हणून तुकाराम मुंढेच्या 25 वर्षाच्या कार्यकिर्दीत 26 वेळा बदली करण्यात आली आहे. आणि आता तर जनतेच्या जीवाशी खेळत असलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदावर नियुक्ती होताच त्यांनी संपुर्ण महाराष्ट्रात अन्नात भेसळ करणाऱ्यांचे धाबे दणाणून सोडले आहे. त्यामुळे जनतेच्या जगण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. त्यामुळे आता महाराष्ट्रातील जनताच अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या मागे खंबीरपणे उभी असल्याचे चित्र सध्या महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी दिसत आहेत आणि विविध स्तरातून तुकाराम मुंढे यांना मोठा व भक्कम पाठिंबा मिळत आहे.

या अनुषंगाने अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची जनतेला नितांत गरज आहे. म्हणून शासनाने तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदावरुन कोणाच्याही दबावाला बळी न पडता निदान तीन वर्ष तरी बदली करु नये अशा आशयाचे पत्र भिवंडी प्रांताधिकारी यांना देण्यात आले. त्यांनीही लागलीच त्यावर रिमार्क मारुन जिल्हाधिकारी मार्फत तुमचे पत्र शासनाकडे पोहचवतो असे आश्वासन शिवसेना शिष्टमंडळाला दिले. अशाच प्रकारे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील, तालुक्यातील सामाजिक संघटना, संस्था, मंडळे यांनी जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांना निवेदन देऊन शासनावर दबावगट तयार केल्यास तुकाराम मुंढेंची बदली करण्यास शासन धजावणार नाही अशा प्रकारचे आवाहन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या भिवंडी शहर जिल्हा शाखेच्या वतीने महाराष्ट्रातील तमाम जनतेला करण्यात येत आहे. मुंडेंसाठीच्या या वाढत्या पाठिंबामुळे सरकारची झोप नक्कीच उडणार असल्याचं भाकीत या प्रचंड पाठिंबामुळे दिसत आहे आणि त्यांना निवडणूक आयोगाच्या आयुक्तपदी बसवण्याबाबतही प्रतिक्रिया समाज माध्यमातून येत असून, यापुढे ही तुकाराम गाथा कोणीही नष्ट हिंमत करणार नाही.

आजच्या या शिष्टमंडळात शहरप्रमुख गजेंद्र गुळवी (भिवंडी पूर्व), प्रदिप बोडके (भिवंडी पश्चिम), नाना झळके (शहर जिल्हा समन्वयक), महेंद्र कुंभारे (शहर जिल्हा संघटक), सौ. दिपाली जैन (जिल्हा संघटिका), भाई वनगे, संतोष भावार्थे (उपशहरप्रमुख), सौ. स्वाती भावार्थे (शहर संघटिका), वैभव (भाऊ) काठवले (शाखाप्रमुख), समीर खिसमतराव (उपविभाग प्रमुख) इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

## स्मृतीदिनाचा खर्च टाळून शैक्षणिक कार्याला मदत



हवेली (दै. संध्या)

सामाजिक कार्यात कायम अग्रेसर असणारे पुरोगामी शिक्षण संस्थेचे विश्वस्त कै.उत्तम आनंदा चौधरी यांच्या द्वितीय स्मृतीदिनी त्यांचे चिरंजीव सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम चौधरी यांनी इतर खर्चाला फाटा देत पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव या शाळेला विद्यार्थ्यांना शैक्षणिक भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी एकावन्न हजार रुपयेची देणगी दिली.त्यांच्या या कृतींचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.ही देणगी पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे, सचिव रंगनाथ आप्पा कड, उपाध्यक्ष रामदास चौधरी , विश्वस्त दत्तात्रय चौधरी, राजेंद्र चौधरी, भिकाजी चौधरी, तसेच सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ आण्णा चौधरी यांनी स्विकारली. यावेळी तुळशीराम चौधरी यांचे अभिनंदन करताना संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे यांनी सांगितले ही देणगी निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी उपयोगी आहे.शाळा विद्यार्थ्यांना एआय तंत्रज्ञानाचा शिक्षण क्षेत्रात उपयोग करण्यासाठी याचा फायदा होणार आहे.देणगीबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.

## एसटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा : महागाई भत्ता ५८ टक्क्यांवर

**घरभाडे भत्ताही वाढवणारं : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची ऐतिहासिक घोषणा**

भिवंडी (दै. संध्या)



"एसटीची आर्थिक घडी सावरत असताना कर्मचाऱ्यांच्या न्याय्य आर्थिक मागण्या टप्प्याटप्प्याने पूर्ण करू. संघटनांनी आंदोलन मागे घ्यावे. कृपया, प्रवाशांना वेठीस धरू नये, ही मनापासून विनंती."
— **प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री.**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सुमारे ८६ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रतापराव सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची ऐतिहासिक घोषणा केली. यासोबतच कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

मुंबई सेंट्रल येथील ' वाहतूक भवन ' या महामंडळाच्या मुख्यालयात आज राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक व प्रशासकीय मागण्यांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली.

बैठकीच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे सर्व कर्मचारी संघटनांना शुभेच्छा देताना, "सामंजस्याची भूमिका घेऊन महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे," असे आवाहन केले.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तात्काळ प्रभावाने एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच वेतनवाढीची थकबाकीही आर्थिक परिस्थितीचा विचार करून टप्प्याटप्प्याने अदा केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या सोबत एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांची बैठक आयोजित करण्यात येईल असे देखील ग्वाही दिली.

बैठकीत कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवाशर्ती, रिक्त पदभरती, बसस्थानक विकास, कल्याणकारी योजना तसेच महामंडळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही देत मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले.

कामगार संघटनांशी सातत्याने संवाद साधून प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे सांगताना मंत्री सरनाईक म्हणाले, "महामंडळाच्या सर्व संघटनांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी असलेली समिती तातडीने स्थापन करण्यात यावी. उत्पन्नवाढीसाठी समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी."

महामंडळाच्या आधुनिकीकरणावर भर देताना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत जवळपास साडेतीन हजार नवीन बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली २०३५ पर्यंत एसटीचा ताफा १०० टक्के इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी राज्यभर आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महामंडळाच्या उत्पन्नवाढीसाठीही ठोस उपाययोजना सुरू असल्याचे सांगताना मंत्री सरनाईक यांनी बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीवर कठोर कारवाईसाठी एसटीच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती प्रियंका नारनवरे यांच्या नेतृत्वाखाली अवैध प्रवासी वाहतुकीच्या विरुद्ध धडक मोहीम राज्यभर राबविण्यात येत आहे. त्याचा चांगला परिणाम एसटीच्या उत्पन्नावाढीवर झाला असून ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येईल असे त्यांनी नमूद केले.

"कर्मचारी आणि प्रशासन यांच्या सुसंवादातून एसटी महामंडळ अधिक सक्षम, प्रवासी-केंद्रित आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे," असा विश्वास व्यक्त करत मंत्री प्रतापराव सरनाईक यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका कायम राहील, अशी ग्वाही दिली.

या बैठकीस महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी प्रियंका नारनवरे, वरिष्ठ अधिकारी, विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी तसेच राज्यभरातील कामगार प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक **संध्या**


नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक




# धुळे-नंदुरबारला राज्याच्या विकासाचे नवे 'ग्रोथ इंजिन' बनवणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : अण्णासाहेब चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

**'अजिंक्य' चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल**



■ मुंबई (दै. संध्या)

धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांमध्ये प्रचंड विकासक्षमता आहे. राज्याच्या विकासाला नवी गती देणारी 'ग्रोथ इंजिन्स' म्हणून या दोन्ही जिल्ह्यांचा विकास करण्याचा शासनाचा निर्धार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. एनसीपीए येथील टाटा थिएटरमध्ये आयोजित माजी खासदार दिवंगत अण्णासाहेब उपाख्य चुडामण पाटील यांच्या 'अजिंक्य' या जीवनचरित्राच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री पंकज भोयर, खासदार शोभाताई बच्छाव, आमदार अमरीशभाई पटेल, ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर, सौरभ शुक्ला, विनय सहस्रबुद्धे , कुणाल पाटील, माजी आमदार जयंत पाटील, चित्रा वाघ उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, धुळे जिल्ह्याने अनेक दशकांपासून महाराष्ट्राला समृद्ध केले आहे. या भागातील मानवी संसाधने, उद्योग, शिक्षण आणि कृषी क्षेत्रातील क्षमता लक्षात घेऊन राज्याच्या नव्या विकास आराखड्यात या दोन्ही जिल्ह्यांना महत्वाचे स्थान दिले जाणार आहे.

दिवंगत अण्णासाहेब चुडामण पाटील यांचे जीवन म्हणजे संघर्ष, राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आर्थिक संकटामुळे गिरणीत नोकरी स्वीकारलेल्या अण्णासाहेबांनी अन्यायाविरोधात लढा उभारला. स्वातंत्र्यलढ्यात मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आणि 'चले जाव' आंदोलनात सहभाग घेत दोन वर्षांचा कारावास भोगला. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि पंडित नेहरू यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांना स्वतःला शिक्षण घेता आले नाही, मात्र समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी शिक्षण संस्थांची उभारणी केली. शाळा, महाविद्यालये, तसेच पुढे वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण संस्थांचे जाळे उभे राहिले. अण्णासाहेबांनी रोवलेले हे बीज पुढील पिढ्यांनी जोपासत मोठा विस्तार घडवून आणल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

अण्णासाहेब सलग तीन वेळा लोकसभेवर निवडून आले. मात्र 'अजिंक्य' ही उपाधी त्यांना केवळ निवडणूक विजयांमुळे मिळालेली नाही. शिक्षण, सहकार, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी उभारलेले कार्य, जोडलेली माणसे आणि लोकांच्या मनात निर्माण केलेला विश्वास हेच त्यांच्या अजिंक्यत्वाचे खरे कारण असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

समाजात आदर्श निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्याचे दस्तावेजीकरण होणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. 'अजिंक्य' हा चरित्रग्रंथ केवळ अण्णासाहेबांच्या जीवनाचा आलेख नसून धुळे जिल्ह्याच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय इतिहासाचाही महत्त्वपूर्ण दस्तावेज आहे, असे त्यांनी नमूद केले.

धुळे जिल्ह्याने विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारी अनेक व्यक्तिमत्वे महाराष्ट्राला दिली आहेत. या जिल्ह्यातील क्षमता आणि कर्तृत्व पाहता हा जिल्हा 'नररत्नांची खाण' असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. आमदार अमरीश पटेल यांच्यासारख्या उद्योजकांनी ग्रामीण भागात उभे केलेले विकास मॉडेलही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

**भावी पिढ्यांना प्रेरणा देणारा ग्रंथ**

'अजिंक्य' या चरित्रग्रंथातून संघर्ष, नेतृत्व, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेची प्रेरणा मिळेल. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी इच्छाशक्ती, दूरदृष्टी आणि समाजहिताची भावना असेल तर मोठे परिवर्तन घडविता येते, हा संदेश अण्णासाहेबांच्या जीवनातून मिळतो. त्यामुळे हा ग्रंथ धुळे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांसाठी प्रेरणास्रोत ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल पाटील यांनी केले. यावेळी लेखकाच्या पत्नी इंदुमती सोमनाथ पाटील यांचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## व्यवस्थापकीय संचालक गटणे यांची मुलाखत

मुंबई (दैनिक संध्या) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या लोकप्रिय कार्यक्रमांमध्ये 'महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची सुवर्णमहोत्सवी वाटचाल' या विषयावर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे (MTDC) व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे यांची विशेष मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, १६ जून २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार असून महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या अधिकृत माध्यमांवरही ती पाहता येणार आहे. तसेच आकाशवाणीच्या 'दिलखुलास' कार्यक्रमातून २२ आणि २३ जून २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत या मुलाखतीचे प्रसारण करण्यात येणार आहे. या मुलाखतीचे निवेदन पूनम चांदोरकर यांनी केले आहे.



## शिष्टमंडळाने घेतली राज्यपाल यांची भेट

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या शिष्टमंडळाने माजी खासदार आणि असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज कोटक यांच्या नेतृत्वाखाली राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी विविध क्रीडा स्पर्धांसाठी युवकांना योग्य प्रशिक्षण मिळण्याबाबत चर्चा झाली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, उत्तर-पूर्वेकडील राज्यांतील खेळाडूंमध्ये गुणवत्ता आहे. पायाभूत सुविधांचे महाराष्ट्रात क्रीडा क्षेत्रात चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. महाराष्ट्राने तेथील गुणवान खेळाडूंना महाराष्ट्रात आणून प्रशिक्षण उपलब्ध करुन द्यावे. क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर असून 'एक भारत, श्रेष्ठ भारत' अभियानांतर्गत इतर राज्यांमध्ये विविध खेळांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले. यावेळी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव संजय शेटे, सहसचिव डॉ. प्रदीप खांडरे, ऑल इंडिया टेनिस असोसिएशनचे महासचिव सुंदर अय्यर, त्रिपुरा ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव तसेच ऑल इंडिया टेनिस असोसिएशनचे सहसचिव सुजित रॉय यांच्यासह विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अनधिकृत शाळा व वर्ग बंद करण्याचे निर्देश

मुंबई (दैनिक संध्या) : दक्षिण मुंबई विभागातील काही शाळा व शाळांमधील काही वर्ग अनधिकृतरीत्या चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी संबंधित शाळांना नोटीस बजावून अनधिकृतरीत्या चालविण्यात येत असलेल्या शाळा व वर्ग तात्काळ बंद करण्याबाबत निर्देश दक्षिण मुंबई विभागाच्या शिक्षण निरीक्षक यांनी दिले आहेत. या सर्व शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. एकही वर्गास मान्यता नसलेल्या मुंबईतील अनधिकृत शाळांमध्ये मदनी हायस्कूल (क्रॉफर्ड मार्केट, मस्जीद), युसुफ मेहर अली हायस्कूल (नारायण तावडे चौक, तुळशीवाडी ताडदेव), मदर तेरेसा हायस्कूल (ब्लॉक नं 11, 90 फिट, धारावी), गणेश विद्यामंदीर (संत कक्कैया मार्ग, धारावी), ऑक्झिलम इंटरनॅशनल स्कूल (बलराम बाबू खाडेकर मार्ग, वडाळा पूर्व) फिनलँड इंटरनॅशनल स्कूल (माहेश्वरी निकेतन, गोपालराव देशमुख मार्ग) यांचा समावेश आहे. अनधिकृतरित्या वर्ग चालविण्यात येत असलेल्या मुंबईतील शाळांमध्ये मोहम्मदीया हायस्कूल (27 मस्जीद मार्ग) येथील इयत्ता 6 वी ते 8 वी पर्यंतचे वर्ग अनधिकृत आहेत. या शाळेत इयत्ता 1 ली ते 5 वी व 9 वी ते 10 वी पर्यंतच्या वर्गांनाच मान्यता आहे. गोल्डन स्पायरल हायस्कूल, परेल (4 बी, ॲडव्हान्स्ड हाऊस, ताडदेव) या शाळेत इयत्ता 6 वी ते 10 वी पर्यंतचे वर्ग अनधिकृत आहेत.

# १ ऑगस्टपासून महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कॉमन मोबिलीटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला असून आज अखेर राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्ड्स लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. दरम्यान, स्मार्ट कार्डच्या वितरणामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार खपवून घेतला



जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले आहे. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणाऱ्या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभ सुरळीतपणे मिळावा, तिकीट वितरण प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि प्रवास व्यवस्थापन अधिक आधुनिक व्हावे, या उद्देशाने स्मार्ट कार्ड प्रणाली राबविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थ्यांनी १ ऑगस्टपूर्वी आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते कार्यान्वित करून घ्यावे, असे आवाहन परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे.

# १२.४० लाख नागरिकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील निरक्षर नागरिकांना साक्षरतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्रपुरस्कृत 'उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम' प्रभावी माध्यम ठरणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील साक्षरता चळवळीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी व्यक्त केला. राज्यात सुमारे १२.४० लाख नागरिकांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, त्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले. केंद्रपुरस्कृत 'उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम' या विषयासंदर्भात मंत्रालयात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. शिक्षण आयुक्त सच्चिंद्रप्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळचे अध्यक्ष श्री. कुलकर्णी, शिक्षण संचालनालयाचे (योजना) संचालक कृष्णकुमार पाटील; तसेच संबंधित विविध अधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. श्री. सिंह म्हणाले की, साक्षरता अभियानात



■ 'उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम'साठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे – प्रधान सचिव रणजीत सिंह देओल

स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदायांचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून 'एकही व्यक्ती निरक्षर राहणार नाही' या उद्दिष्टाने व्यापक मोहीम राबविण्यात यावी. साक्षरता अभियानातील स्वयंसेवक, नवसाक्षर आणि असाक्षर व्यक्तींनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी; तसेच जिल्हास्तरावरील नावीन्यपूर्ण उपक्रम, यशोगाथा आणि अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी उल्लास मेळावा महत्त्वपूर्ण ठरत आहे. राज्यातील साक्षरता अभियान अधिक गतिमान, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे.

राज्यातील साक्षरता चळवळीला अधिक व्यापक लोकसहभाग मिळावा, स्वयंसेवकांना प्रोत्साहन मिळावे आणि ग्रामीण भागात साक्षरतेबाबत जनजागृती व्हावी यासाठी 'उल्लास मेळावा' हे प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याने दरवर्षी त्याचे आयोजन करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली. राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण आणि राज्य साक्षरता केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या वार्षिक कार्यनियोजन आराखड्या बाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली. राज्य पूर्ण साक्षर होण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध प्रयत्न करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. यासाठी देशातील पूर्ण साक्षर राज्यांच्या कार्यपद्धती, उपक्रम आणि यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास करून त्यातील प्रभावी बाबी राज्यात राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. साक्षरता अभियान अधिक परिणामकारक करण्यासाठी सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशनमध्ये दंत पर्यटनाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार

■ मुंबई (दै. संध्या)

विकसित महाराष्ट्र 2047 या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेच्या अनुषंगाने राज्यात दंत पर्यटन (डेंटल टुरिझम) क्षेत्राला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए) यांच्यात सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. राजशिष्टाचार, परकीय गुंतवणूक, डायसपोरा आणि आऊटरीच विभागाच्या पुढाकाराने हा करार करण्यात आला. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनातर्फे सचिव डॉ. राजेश गवांदे आणि उप



सचिव अविनाश सोलावट तसेच इंडियन डेंटल असोसिएशनतर्फे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

राज्यात पर्यटनाच्या नव्या संधी निर्माण करणे, विविध क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील आरोग्यसेवा केंद्र म्हणून विकसित करणे या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या कराराद्वारे महाराष्ट्राला दंत आरोग्य आणि उपचारांसाठी सुरक्षित, पारदर्शक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक केंद्र म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. या सामंजस्य कराराअंतर्गत देश-विदेशातील रुग्णांना महाराष्ट्रातील दंत उपचार सुविधा, टेलि-कन्सल्टेशन सेवा आणि अन्य आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. तसेच दंत आरोग्य क्षेत्रातील प्रशिक्षण, उपचार, संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देण्यासाठी दोन्ही संस्था परस्पर सहकार्य करणार आहेत. मार्गदर्शन, संवाद सहाय्य आणि विविध विभागांशी समन्वय साधण्यासाठी शासन मदत करेल. तर इंडियन डेंटल असोसिएशन प्रशिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि हितधारकांच्या सहभागासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देईल. दंत पर्यटनाला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देण्यासाठी विविध बैठका, कार्यशाळा, परिषद आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येणार आहे. यामुळे महाराष्ट्राच्या आरोग्य पर्यटन क्षेत्राला नवी दिशा मिळण्याबरोबरच राज्याच्या आर्थिक विकासालाही हातभार लागणार आहे. हा करार तीन वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार असून तो अबाध्य आणि गैर-आर्थिक स्वरूपाचा आहे. कोणत्याही प्रकारची आर्थिक बांधिलकी या करारातून निर्माण होणार नसून विशिष्ट प्रकल्पांसाठी स्वतंत्र करार करण्यात येणार आहेत. हा करार केवळ सहकार्याची रूपरेषा निश्चित करणारा इच्छापत्र स्वरूपाचा असून त्यातून कोणतेही कायदेशीर अथवा आर्थिक बंधन निर्माण होणार नाही.

# 'पु.ल. कट्टा' उपक्रमाच्या वर्षपूर्ती निमित्त १२ जून रोजी पु.लं.च्या साहित्याची अक्षरमैफल

■ मुंबई (दै. संध्या)

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडून सुरू करण्यात आलेल्या 'पु. ल. कट्टा' या अभिनव उपक्रमाला १२ जून २०२६ रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षपूर्तीनिमित्त १२ जून २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे 'अक्षरमैफल' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पु. ल. देशपांडे यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या निवडक पत्रांचे आणि लेखांचे अभिवाचन प्रसिद्ध दिग्दर्शक विजय केंकरे, प्रसिद्ध अभिनेते संजय मोने, मीना नाईक, उत्तरा मोने करणार आहेत.

१२ जून २०२५ रोजी सुरू झालेल्या या उपक्रमाने अवघ्या एका वर्षात कलाकार आणि रसिकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. कला, साहित्य, संगीत, नाट्य, अभिवाचन, सुलेखन, चर्चासत्रे, लोककला आणि विविध सांस्कृतिक अभिव्यक्तींना एकाच व्यासपीठावर आणत 'पु. ल. कट्टा' खऱ्या अर्थाने कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ ठरला आहे. गेल्या वर्षभरात या कट्ट्यावर अनेक मान्यवर कलाकार, लेखक, दिग्दर्शक, संगीतकार आणि साहित्यिकांनी उपस्थिती लावली. त्याचबरोबर अनेक नवोदित कलाकारांनाही आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळाली. त्यामुळे 'पु. ल. कट्टा' हा केवळ कार्यक्रमांचा मंच न राहता नव्या प्रतिभेला प्रोत्साहन देणारे आणि विविध कलाप्रकारांना जोडणारे एक समृद्ध सांस्कृतिक केंद्र बनले आहे.




या वर्षभरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांनी रसिकांना वैचारिक आणि कलात्मक मेजवानी दिली. ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते उपेंद्र दाते यांच्यासोबत झालेल्या 'नवा नटसम्राट' या विशेष संवाद कार्यक्रमात त्यांच्या कलाप्रवासातील अनुभव, अभिनय क्षेत्रातील संघर्ष आणि पडद्यामागच्या अनेक आठवणी उलगडल्या. 'अक्षरांचे संगती' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमात पद्मश्री अच्युत पालव यांच्या सुलेखन कलेचा आणि प्रसाद फणसे यांच्या आवाजाच्या जादूचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळाला. अक्षर, रेषा आणि स्वर यांचा संगम असलेल्या या कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ज्येष्ठ लेखक शिरीष कणेकर यांच्या गाजलेल्या लेखनावर आधारित 'वेचक कणेकरी' या कार्यक्रमात त्यांच्या निवडक लेखांचे अभिवाचन, किस्से आणि गप्पागोष्टी रंगल्या. साहित्यप्रेमींसाठी हा कार्यक्रम विशेष आकर्षणाचा ठरला. त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य विभागाच्या दुर्मिळ नाटक जतन योजनेअंतर्गत सादर झालेल्या जयवंत दळवी लिखित 'मुक्ता' आणि मधुसूदन कालेलकर लिखित 'झुंज' या नाटकांचं ध्वनिचित्रमुद्रण ही रसिकांसाठी एक आगळी मेजवानी ठरली. या नाटकांच्या प्रयोगानंतर कलाकारांशी झालेल्या मुक्त संवादाने रंगभूमीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेतील महान सुरबहार वादिका विदुषी अन्नपूर्णादेवी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'A-6 आकाशगंगा' या विशेष कार्यक्रमाने संगीत रसिकांना एक वेगळाच अनुभव दिला. अन्नपूर्णादेवींचे विचार, त्यांचे गुरुतत्त्व आणि संगीत क्षेत्रातील योगदान यांचा उहापोह या कार्यक्रमातून करण्यात आला. तर 'जादू अशी घडे ही...' या सुरेल मैफिलीत हिंदी आणि मराठी प्रेमगीतांनी सजलेली बहारदार संगीत मैफल रंगली. युवा गायक आणि वादक कलाकारांनी आपल्या सादरीकरणातून रसिकांची मनं जिंकली.

या सर्व कार्यक्रमांमधून 'पु. ल. कट्टा'ने विविध कलाशाखांना एकत्र आणण्याचे आणि कलाकार-रसिक यांच्यात थेट संवाद घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. ज्येष्ठ कलाकारांच्या अनुभवसंपन्न मार्गदर्शनाचा लाभ नवोदितांना मिळाला, तर नव्या पिढीतील कलाकारांना स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.

'कलेचा आनंद, विचारांची मेजवानी' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत 'पु. ल. कट्टा'ने अवघ्या एका वर्षात सांस्कृतिक क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कलाकार आणि रसिक यांच्यातील हा सांस्कृतिक सेतू पुढील काळातही अधिक व्यापक आणि समृद्ध होत राहील, असा विश्वास सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी व्यक्त केला आहे.

# उपलब्ध निधीतून उत्पन्नाचे स्त्रोत तयार करा - झोनल मॅनेजर संजय कदम

**सासवड (दै. संध्या)**

नियोजित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमान तळाच्या भुसंपादनातून शेतकऱ्यांना प्राप्त झालेल्या पैशाचा योग्य रीतीने विनियोग व्हावा, त्याचे योग्य नियोजन होणे गरजेचं आहे असे विचार बँक ऑफ इंडियाचे पुणे विभागाचे विभागीय व्यवस्थापक संजय कदम यांनी व्यक्त केले आहेत.पुरंदर तालुक्यात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमान तळाच्या भुसंपादन प्रक्रियेने वेग घेतला असुन त्या अनुषंगाने विमानतळ बाधित एखतपुर गावी शेतकऱ्यांना आर्थिक व्यवस्थापन तसेच नियोजन या बाबत मार्गदर्शन करताना संजय कदम बोलत होते विपनन विभागाचे अधिकारी संदीप अग्रवाल व रजनीश सिद्धनेर्लीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते आपल्या प्रमुख मनोगतात संजय कदम यांनी उपस्थित शेतकऱ्यांना काळ्या आईच्या मातीचे मोल समजून घेत उपलब्ध निधीतुन उत्पन्नाचे स्रोत तयार करा असा सल्ला दिला.राष्ट्रीयकृत बँकांना प्राधान्य द्या असे सांगत बँक ऑफ इंडिया तुमच्या पाठीशी कायम मार्गदर्शक म्हणून उभी आहे त्याचा उपयोग करून घ्या असेही कदम यांनी सांगितले रजनीश व संदीप तसेच या गावचे रहिवाशी व बँकेचे अधिकारी माधव गोसावी, सासवड शाखेचे मॅनेजर सचिन दोलताडे यांनीही या वेळी शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली व मौलिक मार्गदर्शन केले कोणत्याही अमिषाला बळी पडू नका, मोबाईल मधील कोणतीही फाईल ओपन करू नका, डिजिटल अरेस्ट पासून लांब राहा असा उपदेश यावेळी करण्यात आला.उपसरपंच तुषार झुरंगे यांनी सूत्रसंचालन केले तर महादेव नाना टिळेकर यांनी सर्वांचे स्वागत केले.श्रीकांत ताम्हाणे यांनी आभार प्रदर्शन केले नंदुशेठ कुंभार, काळुराम झुरंगे, पोपट भामे, केशव गोसावी, विमल झुरंगे, बंडूतात्या धिवार मंगल टिळेकर, बाजीराव मोरे ताई गोसावी यांसह अनेक शेतकरी, पिसर्वे शाखाधिकारी रविंद्र ओव्हाळ, बँकेचे सेवा निवृत्त अधिकारी रमेश कानडे, हेमंत ताकवले, दत्तात्रय शेटे, बँकेचे बीसी संदीप बनसोडे व धीरज दिवाने या प्रसंगी उपस्थित होते.




## सोमवती यात्रेच्या अनुषंगाने कऱ्हा नदीवरील घाटाची पाहणी

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाची सोमवती यात्रा सोमवार दिनांक 15 रोजी भरणार असून या यात्रेच्या अनुषंगाने पालखी सोहळा मार्ग कऱ्हास्नान घाटाची पाहणी श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी, मानकरी ग्रामस्थ ट्रस्ट, जेजुरी देवसंस्थान व जेजुरी पोलिस स्टेशन व नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आली. वर्षाकाठी खंडोबा देवाच्या दहा यात्रा भरतात. सोमवार अमावस्ये दिवशी येणाऱ्या सोमवती यात्रेला विशेष धार्मिक महत्व आहे. सोमवती यात्रे दिवशी श्री खंडोबा व म्हाळसा देवीच्या उत्सव मूर्ती पालखीत ठेवून जेजुरी गडावरून हा सोहळा कऱ्हा नदीवर स्नानासाठी जातो. हजारो भाविक कऱ्हा नदीचे पाणी आणि पंचामृतानी देवाला स्नान घालतात हा सोहळा अतिशय विलोभनीय असतो. सोमवार दिनांक 15 रोजी सोमवती यात्रा भरत असून या अनुषंगाने पालखी सोहळा मार्ग, पालखीची विसावा ठिकाणे, त्यांची सुरू असणारी डागडुजी, तसेच कऱ्हा नदीवर देव अंघोळी वेळी भाविकांची सुरक्षा, पाण्याची व्यवस्था ,पार्किंग, आदी सुविधांची पाहणी करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जमिनी मिळवून देण्यास महसूल व यवत पोलीस लाचारपणा; महिलांवरती अन्याय

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुका पाटस पाटील मळा या ठिकाणी दोन वर्षापासून स्थानिक शेतकऱ्यांच्या कमी भावात जमिनी विकत घेऊन मोठ्या उद्योगासाठी कानगाव व पाटस दोन्ही गावांच्या सीमेवरती एक खटी जमीनी गोळा करण्याचे काम सध्या जोरात चालू आहे यामध्ये पाटण स्टेशन लोहमार्गाच्या शेजारच्या मोठ्या उद्योगाचा शेत जमिनीवरती डोळा असल्याचे दिसून येत आहे या जमिनीचा ताबा घेण्यासाठी दौंड शिरूर श्रीगोंदा तालुक्यातील सराईत गुन्हेगार या परिसरामध्ये तळ ठोकून आहेत जमिनी खरेदी विक्री करणारा महारथी पोलीस प्रशासन आणि गुन्हेगार यांना एकाच खिशात घालून मिरवताना दिसत आहे पाटस स्टेशन ते पाटील मळा या भागामध्ये सुमारे 60 एकर जमीन हस्तगत केल्याची दिसत आहे आशा जमिनी खरेदी-विक्रीमुळे दौंड महसुली अधिकाऱ्यांना चांगले सुगीचे दिवस आले आहेत आज गुरुवार दिनांक11 रोजी पाटील मळ्यातील पुन्हा एकदा पोलीस महसूल अधिकारी व सराईत गुन्हेगार यांनी एकत्र येऊन शेतजमीन महिलांना कायद्यातील कोणतीही नोटीस न देता दहशतीखाली एका बड्या उद्योजकाला जमिनी हस्तगत करून दिली शेतकरी महिलांचा आक्रोश मोठ्या प्रमाणात दिसून आला मात्र पाटस गावातील एकही नेता महिलेच्या मदतीसाठी आला नाही भविष्य काळामध्ये पाटस व कानगाव परिसरातील शेतकरी महिला असुरक्षित राहतील की काय? असा प्रश्नचिन्ह उद्भवत आहे.




### शस्त्रक्रियेच्या मदतीसाठी सरसावली दुर्गाई

चाकण (दैनिक संध्या) : अत्यंत गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रियेच्या तिघांच्या मदतीसाठी चाकण येथील दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे कार्यकर्ते पुढे सरसावले आहेत. दुर्गाई हृदय प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्तात्रय भेगडे यांनी त्यांचे चिरंजीव दर्शन भेगडे यांच्या वाढदिवसानिमित्त होणारा अनाठायी खर्च टाळून अत्यंत गरजू असलेल्या तीन मुलांच्या हृदय शस्त्रक्रियेसाठी प्रत्येकी दहा हजार रुपये प्रमाणे ३ धनादेश संबंधित मुलांच्या पालकांकडे सुपूर्त केले. याप्रसंगी उद्योजक दत्तात्रय भेगडे, बिपीन रासकर, रोनक गोरे, प्रवीण गोरे, राजेंद्र शिंदे, प्रथमेश गवते, वैभव बागल आदी उपस्थित होते. राजेंद्र शिंदे यांनी सांगितले की," दुर्गाई हृदय प्रतिष्ठान सामाजिक उपक्रमांना विशेष प्राधान्य देत आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजू आणि गरिबांना मदत आणि सहकार्य झाले पाहिजे. हा या प्रतिष्ठानचा हेतू आहे. दुर्गाई हृदय प्रतिष्ठानच्या माध्यमातून गरजूंच्या शस्त्रक्रिया प्राधान्याने करण्यात आलेल्या आहेत. सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून प्रतिष्ठान वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत आहे."

## दर्शनासाठी आले... पण चिमुकली जेजुरीतच राहिली : हरवलेल्या चिमुकलीला केले आजी-आजोबांच्या स्वाधीन

**जेजुरी (दै. संध्या)**

11जून २०२६ रोजी काही भाविक जेजुरीला खंडोबा देवाच्या दर्शनासाठी आले होते. यावेळी आजी व आजोबा यांच्या बरोबर आलेली तीन वर्षांची चिमुकली जेजुरी गडाच्या पायथ्याशी हरवली. जेजुरी देवसंस्थान व जेजुरी पोलिसांनी तातडीने सोशल मीडियावर या चिमुकलीचा फोटो टाकून पालकांचा शोध सुरू केला. रात्री उशिरा या चिमुकलीच्या आजी आजोबांकडे ही मुलगी स्वाधीन केली.जेजुरी पोलिसांच्या सतर्कता, संवेदनशीलता आणि मानवतेमुळे या घटनेचा शेवट अत्यंत गोड झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्याजवळील येथील काही भाविक जेजुरी येथे श्री खंडोबा देवाच्या दर्शनासाठी आले होते.

त्यांच्यासोबत तीन वर्षांची चिमुकली स्वरांशी प्रभाकर गायके हि देखील त्यांच्या बरोबर जेजुरीत आली होती. दर्शन आटोपून सर्वजण गडावरून खाली आल्यानंतर घाईगडबडीत आजी-आजोबा व इतर भाविक टेम्पोमध्ये बसून पुढील दर्शनासाठी आळंदीकडे रवाना झाले.

दरम्यान, आळंदी येथे पोहोचल्यानंतर धक्कादायक बाब त्यांच्या लक्षात आली. त्यांच्यासोबत आलेली तीन वर्षांची स्वरांशी जेजुरीतच राहिल्याचे समजताच सर्वांच्या पायाखालची जमीन सरकली. आजी राहीबाई सुदाम गायके (वय ५५) आणि आजोबा सुदाम अण्णा गायके (वय ६०) यांच्यासह सर्व भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी टेम्पो चालकांनी जेजुरीतील आपले परिचित सुरज चव्हाण यांच्याशी तात्काळ संपर्क साधला. त्यांनी मुलीचे छायाचित्र आणि माहिती सुरज चव्हाण यांना पाठविली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सुरज चव्हाण यांनी तत्काळ जेजुरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधून सदर मुलगी हरवल्याची माहिती दिली. दरम्यान, जेजुरीत एका पार्किंग परिसरातील एका रसवंतीगृहाजवळ ही चिमुकली आढळून आली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ याची माहिती पोलिसांना दिली. यापूर्वी श्री मार्तंड देव संस्थानच्या कर्मचाऱ्यांनी सायंकाळी सुमारे पाच ते सात वाजेपर्यंत मंदिर परिसरात माईकद्वारे अनेक वेळा मुलीबाबत घोषणा करून नातेवाईकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला होता; मात्र कोणताही प्रतिसाद मिळाला नव्हता.

माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी मुलीला सुरक्षित ताब्यात घेतले आणि जेजुरी पोलीस ठाण्यात आणले. पोलीस हवालदार निता दोरके यांनी या चिमुकलीला आईच्या मायेने सांभाळले. तिला जेवण दिले, खेळवले आणि धीर दिला. पोलीस ठाण्यातील इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही तिची काळजी घेतली. त्यामुळे घरच्यांपासून दूर असतानाही स्वरांशी सुरक्षित आणि आनंदी राहिली. अखेर रात्री उशिरा आळंदीहून रिक्षाने प्रवास करून आजी-आजोबा जेजुरी पोलीस ठाण्यात पोहोचले. सुमारे साडेअकरा वाजता चिमुकली स्वरांशी आपल्या आजी-आजोबांच्या कुशीत परतली आणि उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. जेजुरी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांनीही या प्रकरणात विशेष सहानुभूती दाखवत आवश्यक मार्गदर्शन केले. या वेळी पोलीस कर्मचारी प्रसाद कोळेकर, योगेश चितारे, निता दोरके, उदय पवार, ठाणे अंमलदार तात्यासाहेब खाडे, तसेच सामाजिक कार्यकर्ते गिरीश झगडे उपस्थित होते.

या संपूर्ण घटनेत जेजुरी पोलिसांनी केवळ आपले कर्तव्य बजावले नाही, तर मानवतेचेही दर्शन घडवले. हरवलेल्या चिमुकलीला सुरक्षित ठेऊन तिची चांगली काळजी घेऊन कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्याची ही घटना जेजुरी पोलिसांच्या तत्परता, संवेदनशीलता आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीची साक्ष देणारी ठरली आहे. कायद्याचे रक्षण करताना माणुसकीही जपणारे जेजुरी पोलीस अशीच भावना या घटनेनंतर नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## नारायणगाव पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव पोलीस स्टेशन परिसरात घडलेल्या मोटार चोरी व केबल चोरीच्या दोन गुन्ह्यांचा यशस्वी तपास लावत नारायणगाव पोलिसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून चोरीस गेलेली मोटार व केबल सह सुमारे २१२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नारायणगाव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर क्रमांक १९५/२०२६ व १९६/२०२६ या प्रकरणाचा समांतर तपास सुरू असताना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयित आरोपींचा शोध घेण्यात आला .त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्ह्यांची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अशोक शांताराम केदार वय ३५वर्षे रा. कवडेवस्ती ओझर तालुका जुन्नर ,आकाश विलास काळे वय २२वर्षे व समीर संतोष पारधी वय ३५वर्षे दोघेही रा.नंबरवाडी ,वारुळवाडी ता. जुन्नर जि. पुणे यांचा समावेश आहे.

आरोपींकडून चोरीस गेलेली मोटार व मोटारीचे केबल साहित्य जप्त करण्यात आले असून जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत २१२०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून पुढील तपासणीसाठी त्यांची पोलीस कोठडी घेण्यात आली होती.



त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार आरोपींना मध्यवर्ती कारागृह येरवडा पुणे येथे रवानगी करण्यात आली. या गुन्ह्यांचा तपास सहाय्यक पोलीस फौजदार तबाजी दाते व पोलीस हवालदार मगनलाल भुसावरे करीत आहे.ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल,अपर पोलीस अधीक्षक शुभम कुंभार व उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नारायणगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने केली.

## संजय राऊत उबाठाचे खातात आणि काँग्रेसची चाकरी करतात

**भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात**

**पुणे (दै. संध्या)**




रोहित पवारांनी शेतकऱ्यांसाठी अन्नत्याग आंदोलन करण्याऐवजी "स्टंटबाजी त्याग" आंदोलन केले पाहिजे. कारण त्यांच्या स्टंटबाजीला महाराष्ट्र वैतागलेला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे आणि शेतकऱ्यांच्या खात्यावर 30 तारखेनंतर कर्जमाफीचे लाभ मिळतील, हे माहीत असतानाही प्रसिद्धी आणि स्टंटबाजीसाठी रोहित पवार फक्त आणि फक्त रोज खोटे आरोप करतात. त्यामुळे त्यांनी अन्नत्याग आंदोलनाऐवजी स्टंटबाजीत्याग आंदोलन केले तर अधिक हिताचे होईल, असे श्री. बन यांनी सुनावले.

उबाठा गट वाढण्यासाठी संजय राऊत जितका प्रयत्न करत नाहीत, त्यापेक्षा जास्त प्रयत्न काँग्रेस वाढली पाहिजे आणि राहुल गांधी पंतप्रधानपदावर बसले पाहिजे यासाठी करतात. आज ते ज्या पोटतिडकीने तशी भूमिका मांडत आहेत, त्यावरून स्पष्ट होते ते मीठ उबाठा गटाचे खात आहेत पण चाकरी मात्र काँग्रेस आणि राहुल गांधींची करत आहेत, असा घणाघात भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शुक्रवारी केला. बिर्ला क्रीडा केंद्रात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ममता बॅनर्जी, शरद पवार यांचे पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करायचे असतील तर मग उबाठा गटाचे काँग्रेसमध्ये विसर्जन करून राहुल गांधी यांना काँग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करणार आहात का, याचे उत्तर आधी संजय राऊत यांनी द्यावे. उबाठा गट वाढवण्याची किंवा भूमिका मांडण्याची जबाबदारी असताना फक्त आणि फक्त राहुल गांधींची भूमिका मांडण्याचे काम आणि काँग्रेस वाढवण्याचा प्रयत्न त्यांच्यामार्फत केला जातो आहे. इंडिया आघाडीच्या ठिकऱ्या उडवण्याचे काम महाराष्ट्रात, देशातही झाल्याने काँग्रेस ही नाकर्ते लोकांची पार्टी आहे, हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. मात्र एक नक्की आहे की काँग्रेस वाढणार नाही तर काँग्रेसच्या ठिकऱ्या उडून ती वेगवेगळ्या पक्षांमध्ये विलीन होईल, अशी टीका श्री. बन यांनी केली.

श्री. बन पुढे म्हणाले, वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते की, ज्यादिवशी उबाठा गटाची किंवा शिवसेनेची काँग्रेस होईल, त्यादिवशी मी माझे दुकान बंद करेन. त्यानुसार उद्धव ठाकरे यांनी आपले दुकान बंद करायची गरज होती. अखेर महाराष्ट्रातल्या जनतेने त्यांचे दुकान बंद करून टाकले. महाविकास आघाडीच्या दुकानाला शटर लावण्याचे काम महाराष्ट्रातल्या जनतेने केल्याने संजय राऊत वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे शब्द खरे करून एक दिवस उबाठा गटाचे दुकान बंद करून ते काँग्रेसमध्ये विलीन करणार आहेत.

संजय राऊत यांनी पुन्हा एकदा महाभारत वाचले पाहिजे. महाभारतात संजय ज्यांच्या बाजूने होता ते कौरव होते आणि आताचे संजय कुणाच्या बाजूने आहेत हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. संजय नावाचे पात्र हे धृतराष्ट्राच्या आणि कौरवांच्या बाजूने होते. त्यामुळे महाविकास आघाडी ही कौरव आहे तर एनडीए ही पांडवांची भूमिका करते. महाभारताच्या काळात ज्या पद्धतीने अर्जुन या देशाचे नेतृत्व करत होता अगदी त्याचपद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी अर्जुनाची दृष्टी ठेवून आपला देश कुठे गेला पाहिजे यासाठी प्रयत्न करत असल्याचे श्री. बन यांनी नमूद केले.

## विस्मृतीत गेलेल्या रामनदीकडे पुन्हा वळले पुणेकरांचे लक्ष

**शैक्षणिक प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद -पीव्हीपी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर तर्फे आयोजन**

**पुणे (दै. संध्या)**



एकेकाळी परिसराच्या पर्यावरणीय समतोलाचा महत्त्वाचा आधार असलेली, मात्र नागरीकरणाच्या वाढत्या दबावामुळे दुर्लक्षित झालेली रामनदी पुन्हा एकदा पुणेकरांच्या चर्चेचा विषय ठरली आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित ‘रामनदी : ए रिव्हर लेफ्ट बिहाइंड’ या शैक्षणिक प्रदर्शनातून नदीची सद्यस्थिती, तिच्यासमोरील आव्हाने आणि पुनरुज्जीवनाच्या शक्यता नागरिकांसमोर मांडण्यात आल्या. प्रदर्शनाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे रामनदी संवर्धनाबाबत नव्याने जनजागृती होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित या प्रदर्शनात पीव्हीपी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मधील चौथ्या वर्षातील बी.आर्क. विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या क्षेत्रीय संशोधन, हितधारक सर्वेक्षणे आणि बहुविषयक डिझाइन अभ्यासाचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी रामनदीच्या सद्यस्थितीचा सखोल अभ्यास करून नदी परिसराचे भौगोलिक व पर्यावरणीय नकाशांकन, गृहनिर्माण रचना, सामाजिक सुविधा तसेच हवामान-संवेदनशील पायाभूत सुविधांबाबत विविध प्रस्ताव मांडले. त्यांच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने नागरिक, तज्ज्ञ आणि पर्यावरणप्रेमींचे विशेष लक्ष वेधून घेतले.

प्रदर्शनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ‘सिटी अॅज अ क्लासरूम’ ही अभिनव अध्यापन पद्धती. या संकल्पनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेटी, नागरिकांच्या मुलाखती, प्राथमिक दस्तऐवजीकरण आणि माहिती विश्लेषणाच्या माध्यमातून अभ्यास पूर्ण केला. त्यामुळे शैक्षणिक अभ्यासक्रमाला प्रत्यक्ष शहर, पर्यावरण आणि नागरिकांच्या प्रश्नांशी जोडण्याचा प्रयत्न यशस्वी ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला आरती किर्लोस्कर, सोनल सांचेती, मानसी करंदीकर आणि केतकी घाटे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. त्यांनी रामनदीच्या संवर्धनासाठी शैक्षणिक संस्था, तज्ज्ञ आणि स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वयाची आवश्यकता अधोरेखित केली.

पर्यावरणपूरकतेचा संदेश जपण्यासाठी प्रदर्शनातील सर्व आडवे आणि उभे डिस्प्ले स्ट्रक्चर्स पुनर्वापरित कागदी नळ्यांपासून तयार करण्यात आले होते. त्यामुळे शाश्वततेची संकल्पना केवळ विषयापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष प्रदर्शनाच्या रचनेतही प्रतिबिंबित झाली.

‘स्ट्रीम्स ऑफ पुणे’ या दीर्घकालीन उपक्रमांतर्गत रामनदी हा पहिला अभ्यास विषय असून, पुढील काळात मुळा-मुठा नदी प्रणालीतील इतर उपनद्यांचाही समावेश करण्यात येणार आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि स्थानिक घटकांच्या सहकार्याने नदी पुनरुज्जीवनासाठी सर्वसमावेशक अहवाल तयार करून तो संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडे सादर करण्याचे नियोजन असल्याची माहिती आयोजकांनी दिली. प्रदर्शनासाठी पुणे इंटरनॅशनल सेंटर आणि इकॉलॉजिकल सोसायटी, पुणे यांनी सहकार्य केले.

